॥ सबका मालिक आत्मा ॥



सर्व आत्मप्रेमी भाविकांना

**आत्मा मालिक गुरूपौर्णिमा महोत्सव**

निमित्त

मनःपूर्वक शुभेच्छा!

## आत्मा (SOUL)

॥ हृदयामध्ये आत्म्यावरती प्रेम करण्याची कला म्हणजे ध्यान ॥

आत्मचिंतनाद्वारे
विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक

॥ ॐ गुरुदेव ॥

# आत्मा मालिक

जुलै-२०२६

## ॥ सबका मालिक आत्मा ॥



# ॥ अमृतवाणी ॥

या जगात एकच सत्य आहे आणि ते म्हणजे आत्मा. जगातील सर्व वस्तू नष्ट होतील, सृष्टीत असंख्य घडामोडी होतील, पण आत्मा हा चिरकाल टिकेल. कारण त्याला आदिही नाही आणि अंतही नाही. अनादि कालापासून आत्मतत्त्व चालत आलेले आहे आणि अनंतकाळापर्यंत असेच चालत राहील. कारण तो अमर आहे. सर्व देवांच्या उत्पत्तीपूर्वी आत्मा अस्तित्वात होता म्हणून आपण आत्म्याची पूजा केली पाहिजे. आत्म्यावर प्रेम केले पाहिजे. तसेच क्षणभर केलेले आत्मचिंतन कितीतरी श्रेष्ठ आहे. आत्म्याची पुजा केल्यास ती सर्व देवांची पूजा होते.

ईश्वरप्राप्तीचा सर्वात साधा, सोपा आणि सहज मार्ग म्हणजे आत्मचिंतन. कारण ईश्वर आत्म्याच्या स्वरुपात प्रत्येकाच्या, हृदयात बसलेला आहे. नुसतं रुपाला न पाहता 'स्व-रुपाला' पहा आणि ईश्वर प्राप्ती करुन घ्या.

आत्मा हा निर्गुण आणि निराकार आहे. त्याला पाहण्यासाठी कोणत्यातरी सगुण साकार रुपाची आवश्यकता असते. म्हणून कोणत्याही आकारात निराकाराचे ध्यान करावे. सद्गुरुचे आत्मरुपात ध्यान करा. आत्म्याला जात, धर्म नसतो. हिंदू, मुस्लिम, शीख, पारसी सर्वांना आत्मचिंतनाने ईश्वरप्राप्ती होते. भगवान श्रीकृष्ण, येशुख्रिस्त, मोहंमद पैगंबर, गुरूनानक, भगवान महावीर, भगवान गौतम बुध्द या सगळ्यांनी आत्म्याची ओळख करुन घेऊन त्याचे चिंतन केले म्हणूनच ते ईश्वररुप झाले.

## ॥ आत्मा मालिक ॥

''आत्मचिंतनाद्वारे विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक''
# मासिक ॐ गुरुदेव
वर्ष २५ वे अंक ७ वा जुलै २०२६ ● RNI-MAHMAR/2001/4853

**संस्थापक संपादक**

हृदयनिवासी संत सच्चिदानंद महाराज
हृदयनिवासी संत देवानंद महाराज

**संपादक**

संत परमानंद महाराज
मो. ९५९५९७०२२०, ९९२२०७०२२०

**संपादकीय सल्लागार**

श्री. नंदकुमार सूर्यवंशी
श्री. भगवान दौंड
श्री. हनुमंत भोंगळे

**मार्गदर्शक**

संत निजानंद महाराज
संत विवेकानंद महाराज

**आत्मा मालिक ध्यानपीठ**

दीपक टिळेकर, मो. ८३८००३९३०५
सुखदेव मोरे, मो. ७०५८०५९६६१

**प्रसादालय विभाग (अखंड अन्नदान छत्र)**

श्री. प्रकाश भट, मो. ८६०५४६४५५५
श्री. बाळासाहेब गोर्डे, मो. ७५८८६९४०७४
श्री. प्रकाश गिरमे, मो. ९८५०३३८०५५

**धर्मशाळा (निवास व्यवस्था)**

विलास गायकवाड,
मो. ९९२२१७४२११

संपादकीय - आपणासारिखे करिती तात्काळ - संत परमानंद महाराज ४

श्रीसद्गुरुदर्शन -डॉ. विजय बाणकर ६

संतांचे ग्रंथ हेच सदगुरू - नामदेव सदावर्ते १२

संत सद्गुरू -बंडोपंत कुलकर्णी १७

द्वैताची झाडणी गुरुविण ज्ञान - डॉ. सुनील शिंदे २१

गुरुभक्तीतून आत्मोद्धार -बी. के. गायकवाड २५

हार-ही-हीरा - नीता एवम नरेश यादव २९

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांतील मतांशी संपादक, प.पू. गुरुदेव माऊली, आश्रम संत, पदाधिकारी, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (वादप्रतिवाद कोपरगांव न्यायकक्षेत.)

ॐ गुरुदेव हे मासिक संपादक, मालक व प्रकाशक संत परमानंद महाराज, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो. कोकमठाण यांनी मुद्रक संतोष दत्तात्रय माळी, श्री ग्राफिक्स, गांधीनगर रोड, कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे मुद्रीत करुन विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो.कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे प्रकाशित केले.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

## आपणासारिखे करिती तात्काळ

**संपादकीय**



गुरू म्हणजे जो लघु नाही तो आणि जो लघुला गुरू बनवतो. गुरू साधकाच्या, शिष्याच्या जीवनाचा नकाशा म्हणून कार्य करतो. ज्याच्या जीवनप्रवसात गुरूरुपी नकाशा आहे, तो जीवनाचा भवसागर पार केल्याशिवाय राहत नाही. परीस लोखंडाचे सोने बनवतो पण स्वत: सारखा परीस बनवित नाही. गुरू तर शिष्याला स्वत:चे गुरुत्व देवून शिष्याला स्वत:च्या प्रतिमूर्ती रुपात तयार करतो. प्रत्येकाच्या जीवनामध्ये ही आत्मपौर्णिमेची पहाट निर्माण करणाऱ्या सद्‌गुरुला कृतज्ञपूर्वक नमन करण्यासाठी व्यासपौर्णिमा, गुरुपौर्णिमा साजरी करुया.

**-संत परमानंद महाराज**

**आ**षाढ शुद्ध पौर्णिमा ही भारतीय संस्कृतीमध्ये व्यास पूजेचा दिवस म्हणून ओळखली जाते. या दिवशी संस्कृतीला महान बनवणाऱ्या व संस्कृतीचे यशस्वी संक्रमण करणाऱ्या ऋषींचे, अर्थात् आपल्या संस्कृतीला पाचवा वेद म्हणून ज्याला गौरविण्यात येते, असा संस्कृतीचा महान ज्ञानकोष ‘महाभारता’सारखा ग्रंथ ज्यांनी दिला, त्या वेदव्यासांच्या पूजनाचा कृतज्ञता दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा! वेदव्यासांच्या माध्यमातून श्रीकृष्णाचे तत्वज्ञान अमर बनविण्यासाठी संस्कृतीचा प्रचार, प्रसार, चिंतन व ध्यान करणाऱ्या प्रत्येक पीठाला ‘व्यासपीठ’ असे संबोधन रूढ झाले. व्यासपीठावरुन जो विश्वकल्याणासाठी नि:स्वार्थ भावाने कार्य करतो, स्वत:चे जीवन व्रतस्थ करुन वेदमान्य, व्यासमान्य विचारांच्या प्रचार- प्रसारासाठी विविध मार्गाने कार्य करुन समाजाचा उद्धार करतो, अशा गुरुंच्या पूजनाचा हा दिवस.

गुरू म्हणजे जो लघु नाही तो आणि जो लघुला गुरू बनवतो. गुरू साधकाच्या, शिष्याच्या जीवनाचा नकाशा म्हणून कार्य करतो. ज्याच्या जीवनप्रवसात गुरूरुपी नकाशा आहे, तो जीवनाचा भवसागर पार केल्याशिवाय राहत नाही. परीस लोखंडाचे सोने बनवतो पण स्वत: सारखा परीस बनवित नाही. गुरू तर शिष्याला स्वत:चे गुरुत्व देवून शिष्याला स्वत:च्या प्रतिमूर्ती रुपात तयार करतो. ‘आपणासारिखे करिती तात्काळ’ या न्यायाने गुरूच्या चित्तरूधिरातून केवळ शिष्याभिसरणच चालू राहते. अशाच गुरुशिष्यांच्या जोड्या विश्वपरंपरेत, गुरुपरंपरेत शोभून दिसतात. म्हणूनच राम-लक्ष्मण गुरू विश्वामित्र, वसिष्ठांच्या सेवेत गुंतलेले दिसतात. संजीवनी विद्या प्राप्त करणारा कच शुक्राचार्यांच्या, शुक्राचार्य जनकाच्या तर जनक याज्ञवल्क्याच्या मार्गाने जाताना दिसतात. कृष्ण-सुदामा सांदिपनींच्या आश्रमात रमताना दिसतात. अर्जुन द्रोणाचार्यांशी गुजगोष्टीत रत दिसतो, तर कर्ण परशुरामाची अग्निपरीक्षा देण्यातही धन्यता मानतो. ‘मी सॉक्रेटिसचा शिष्य आहे’ हे प्लेटो अभिमानाने सांगतो, तर ‘प्लेटो माझा गुरू आहे’ याचा कृतज्ञ भाव मिरवण्यात ॲरिस्टॉटल धन्यता मानतो. खरेतर या आणि अशाच शेकडो हजारो गुरुपरंपरतेतील गुरू-शिष्यांच्या जीवनातील आजचा दिवस हा खऱ्या अर्थाने आत्महोत्सवाचा दिवस... आत्मविजयाचा दिवस.. आत्मपौर्णिमेचा दिवस...!

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

अशीच आत्मपौर्णिमेची पहाट ज्यांच्यामुळे सकल मानव जीवनात आली. ते प. पू. प्रातःस्मरणीय आत्मा मालिक माऊली! प. पू. आत्मा मालिक माऊलींनी सैरभैर झालेल्या माणसांचा हात धरला आणि त्याला बाह्य प्रवासाबरोबरच आंतरिक प्रवासाचा मार्ग प्रशस्त केला. आजपर्यंत कोसो योजने पायाने चालणारा माणूस या भवसागरात केवळ यात्रेचा अनुभव घेत होता. गुरुदेवांनी त्याला हृदयाकडे चालायला शिकविले. आज तो जीवनयात्रेत तीर्थयात्रेचा अनुभव घेतो आहे. वस्तूंवर, पदार्थांवर प्रेम करणाऱ्या आणि आत्मचैतन्यापेक्षा इतर गोष्टींवर जीव टाकणाऱ्या माणसांना गुरुदेव सांगतात 'माणसाचे खरे स्वरुप आत्मा आहे. म्हणूनच त्यांना आत्म्यापेक्षा कमी मौल्यवान गोष्टीसाठी जीव टाकू नये. हे ज्याला जमेल, त्याच्या जीवनात आत्मपौर्णिमेची पहाट उगवल्याशिवाय राहणार नाही.' आणि म्हणूनच आत्म्याला समजण्यासाठी गरज आहे ध्यानाची. ध्यानातूनच आत्मिक सौदर्यांची जाण आणि भान निर्माण होणार आहे. गुरुदेवांच्या या राजमार्गावरून, ध्यानमार्गावरून आज हजारो लाखो जीवनयात्री केवळ देशातच नव्हे तर विदेशातही मोठे श्रद्धापूर्वक ध्यानक्रमण करत आहेत. गुरुदेव सांगतात, प्रत्येक आत्मा हा त्या विश्वात्म्याचा एक अंश आहे. म्हणूनच प्रत्येक आत्मा दुसऱ्या आत्म्याला जोडलेला असतो. प्रत्येक आत्मा, मग तो कोठेही असो, त्याचा सर्व जगाशी संबंध येतो. आत्मा ही अखंड वस्तू आहे. आत्मा हा विश्वात्मक व विश्वव्यापी आहे. महासागरातील अनंत लाटा जशा त्याच महासागराच्या अंश असतात. त्याचप्रमाणे तुमचा, माझा, याचा-त्याचा आपणा सर्वांचा आत्मा हा त्याच विश्वात्म्याचे (परमात्म्याचे) अंश आहे. या अखंडत्वामुळेच विश्वकल्याणासाठी, विश्वशांतीसाठी आपण केलेल्या क्षणभर ध्यानामुळे एक वहिवाट तयार होणार आहे आणि ही वहिवाटच उद्याच्या आत्मप्रेमी, आत्मोन्नत समाजाची नांदी ठरणार आहे.

असे विश्वात्मक गुरुदेव ज्यांच्या जीवनात आले ते धन्य झाले. प. पू. आत्मा मालिक माऊली गुरुंच्या रुपात जीवनात येणे ही महद्भाग्याची गोष्ट आहे. आजच्या कराल काळामध्ये अनंत समस्या व अनंत प्रश्नांनी माणसाचे विघटन होत असताना त्यांचे सुघटन ध्यानाच्या रुपाने करून जगण्याचा राजमार्ग प्रशस्त करणाऱ्या दुर्मीळ सद्‌गुरुंच्या मालिकेतील शुक्रतारा कोकमठाण आश्रमाच्या नभांगणात केवळ आणि केवळ आपल्यासाठीच प्रकाशमान होताना दिसतो. या दिव्य प्रकाशात स्वतःला सापडण्याची, स्वतःला शोधण्याची, ओळखण्याची संधी प्रत्येक जीवाला मिळाली आहे. प्रत्येकाच्या जीवनामध्ये ही आत्मपौर्णिमेची पहाट निर्माण करणाऱ्या सद्‌गुरुला कृतज्ञपूर्वक नमन करण्यासाठी आजची व्यासपौर्णिमा, गुरुपौर्णिमा अर्थातच आत्मपौर्णिमा साजरी करुया. प. पू. आत्मा मालिक माऊलींना कोटी-कोटी नमन.

**'ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्ति ।**
**द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्वमस्यादिलक्ष्यम ।।**
**एकं नित्यं विमलमचलं सर्वधिसाक्षिभूतं।**
**भावातितं त्रिगुणरहितं सद्‌गुरुं तं नमामि।।**

**-संत परमानंद महाराज,**

संपादक

***

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**



**श्रीसद्गुरुदर्शन**

श्रीसद्गुरू म्हणजे सर्वेश्वर होय. त्यांच्याठायी असलेल्या गुणांना मर्यादा ती कशी असू शकेल? तथापि जगाचा उद्धार करण्यासाठी ते मनुष्यवेश धारण करतात. त्यांची कृपादृष्टी झाली की शरणागत सत्शिष्य ब्रह्मरूप होऊन सृष्टीत वावरू लागतो; आकारास येणे व निराकार होणे या गोष्टी त्याच्यासाठी उरलेल्या नसतात; कारण, त्या समूळ मिथ्या आहेत, असे तो अनुभवत असतो. श्रीसद्गुरुंची प्रकृती मानुषी म्हणजे माणसासारखी दिसत असली तरी त्यांच्या ठिकाणी अमानुष म्हणजे अनंत, अमर्याद सामर्थ्य असते. त्यांच्या केवळ कृपाकटाक्षामुळे जीवास ब्रह्मरूप प्राप्त होते.

**- डॉ. विजय बाणकर**

**परमेश्वरप्राप्ती व गुरु-शिष्य परंपरा**

परमेश्वरप्राप्ती ही सर्वश्रेष्ठ सिद्धी होय. हजारो मनुष्यांतील कुणी एखादा या सिद्धीने युक्त म्हणजे सिद्ध होण्यासाठीचा प्रयत्न करतो आणि अशा हजारो मनुष्यातीलही क्वचित एखादा परमेश्वराला तत्त्वत: जाणतो, असे 'गीतेत' म्हटले आहे. देवाला तत्त्वत: जाणणे म्हणजे श्रीरामकृष्णादी अवतारी महात्म्यांच्या वा देवाच्या मूळ स्वरूपाचे आकलन होणे होय. बाह्य वा समोरच्या वस्तूंना वा व्यक्तिंना जसे आपण जाणत असतो तसे देवाला जाणता येत नाही, हे सूचित करण्यासाठी 'परमेश्वप्राप्ती होणे', हे शब्द योजिले गेले आहेत. म्हणूनच 'गीतेचा' भावार्थ असणाऱ्या 'ज्ञानेश्वरी'त शेवटी, परमेश्वरप्राप्तीचा 'तो' प्रकार जाणता यावा म्हणून किंवा परमेश्वरप्राप्ती होते म्हणजे नेमके काय होते, ते समजावे म्हणून देवानेच गुरुशिष्य परंपरा रूढ करून ठेवली आहे, असे म्हटले आहे. अर्थात परमेश्वरप्राप्तीचे स्वरूप फक्त श्रीसद्गुरूच समजावून सांगू शकतात, त्याबाबतच्या अंतर्निष्ठ अनुभवाच्या वाटेवरून घेऊन जात ते आपल्या शिष्याला देवाची ओळख करून देऊ शकतात. म्हणूनच देव व सद्गुरू प्रत्यक्ष समोर आले असताना आधी सद्गुरुंना नमन करणे, हे सर्वथैव उचित ठरते.हा हितकारक व गुरुमाहात्म्यसूचक विचार संत श्रीकबीर यांनी ज्यात व्यक्त केला आहे, त्या दोह्याचा भावानुवाद असा आहे -

**आधी नमू मी कुणां उभे जैं समोर देव गुरू ।**
**दिला दावुनी देव आपण समर्थ श्रीसद्गुरू ॥**

**श्रीसद्गुरुंचे स्वरूप -**

असत्-निरपेक्ष म्हणजे अखंड सत् किंवा सदसद्विलक्षण असे ते देवाचे अविनाशी अंतिम स्वरूप होय. तेच त्याचे अंश असलेल्या तुझे, माझे व आपल्या सर्वांचे खरे वा मूळ स्वरूप आहे, असे शिष्याच्या अनुभवास आणून देणे हे सद्गुरुंचे सर्वोत्तम कार्य होय. श्रीसद्गुरुंच्या अशा स्वरूपाचा व ते करीत असलेल्या ह्या सर्वश्रेष्ठ कार्याबाबतचा संस्कार जनमानसावर व्हावा आणि तो कायम रहावा म्हणूनच गुरू या शब्दाला सत् हा प्रत्यय लावून सद्गुरू हा शब्द तयार केला गेला आहे.

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

**श्रीसद्‌गुरुच समर्थ असतात -**

समर्थ हे श्रीसद्‌गुरुंचे सर्वश्रेष्ठत्व सांगणारे एक खास विशेषण आहे. केवळ श्रीसद्‌गुरूच सत्शिष्याला आपल्यासारखे करू शकतात; त्यासाठी, संत श्रीतुकाराम म्हणतात त्याप्रमाणे, त्यांना अनुकूल काळाची वा वेळेची म्हणजे एखाद्या शुभ मुहूर्ताची गरज नसते. त्यांच्या ठिकाणी असलेल्या त्या अनन्यसाधारण सामर्थ्याची कल्पना यावी म्हणूनही त्यांना समर्थ म्हटले जाते. 'समर्थें समर्थ करावे । तरीच समर्थ म्हणवावे ।....' या समर्थ श्रीरामदास स्वामींच्या वचनातूनही समर्थ हे विशेषण कुणाला लावणे योग्य आहे व खऱ्या अर्थाने कोण समर्थ आहे, त्याबाबतची जाणीव करून दिली आहे. देव, आपण, शिष्य व पर्यायाने जगातील सर्व सजीव व जडवस्तू मुळात आत्मरूप आहेत. म्हणजे विश्वातील सर्वांचा मूळ 'अर्थ' (परमोच्च ध्येय वा प्राप्तव्य) सम म्हणजे सारखाच (सारखेच) आहे. असा अखंड अनुभव असणारे व तसे अनुभवास आणून देण्याचे सामर्थ्य असणारे श्रीसद्‌गुरू सदैव समर्थ असतात.

**श्रीसद्‌गुरुमाहात्म्य -**

'श्रीगुरुपौर्णिमेनिमित्त' प्रकाशित होणाऱ्या या विशेष अंकातील या लेखात संत श्रीकबीर यांच्या काही दोह्यांच्या व अन्य काही संतांच्या काही वचनांच्या आधारे श्रीसद्‌गुरुंचे माहात्म्य व कार्यस्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न करूयात -

**१) श्रीसद्‌गुरू हे देवाहून श्रेष्ठ होत -**

देवाचे स्मरण करतात त्यांना पुनर्जन्म वा अनेक जन्म घ्यावे लागतात; पण, श्रीसद्‌गुरुंचे अखंड स्मरण करणारा मात्र याच जन्म मुक्त होतो; 'याचि देहीं याचि डोळां' तो 'मुक्तीचा सोहळा' अनुभवतो. म्हणूनच सद्‌गुरू हे देवाहून श्रेष्ठ असल्याचे श्रीकबीर यांनी म्हटले आहे.

**२) श्रीसद्‌गुरुच आत्मज्ञानदीप प्रज्ज्वलित करू शकतात -**

श्रीकबीर म्हणतात की, लोकांप्रमाणे मीही वेदांच्या आधारे देवप्राप्तीसाठी प्रयत्न करीत होतो व त्यामुळे त्यांच्याप्रमाणे देवप्राप्तीसाठीच्या एकमेव मार्गापासून दूर गेलो होतो, म्हणजे वाहवत वा भरकटत गेलो होतो; पण, श्रीसद्‌गुरुंची भेट झाली आणि त्यांनी माझ्या हातात आत्मज्ञानाचा दीप दिला. त्यांनी माझ्या हृदयात आत्मज्ञानदीप प्रज्ज्वलित केल्यामुळेच माझ्या ठिकाणी पूर्वी होता तो स्वरूपविषयक अज्ञानरूपी अंधार नाहीसा झाला व आत्मारूपी सूर्य सदोदित झाला. 'गुरुगीतेत' केली आहे तशी गुरू या शब्दाची त्यांनीही व्याख्या दिली आहे. त्यांच्या त्या दोह्याचा भावानुवाद असा आहे -

**'गुकार तो तमदर्शक जाणा प्रकाशवाचक रू ।**
**अज्ञानतम ते ज्ञानें निरसी तयां म्हणावे गुरू ।।'**

संत श्रीनामदेवांसारखे समर्थ संतही आपल्या कीर्तनांमधून, प्रवचनांमधून जगीं म्हणजे लोकांच्या अंत:करणात आत्मज्ञानदीप प्रज्ज्वलित करीत होते, करीत असतात व करीत असतील.

**३) श्रीसद्‌गुरुसेवा : देवभेटीचा एकमेव उपाय -**

अनंतविश्वांचा निर्माता असलेल्या देवाच्या प्राप्तीसाठी ब्रह्मदेव, अनेक देवदेवता, मुनी, मानव वगैरे सारे प्रयत्न करतात, ते थकून जातात पण त्यांना ज्याची भेट होऊ शकत नाही त्या देवाधिदेवाची भेट

श्रीसद्‌गुरुंची सेवा केल्याने मात्र निश्चित होते. श्रीसद्‌गुरुंनी उपदेशिल्याप्रमाणे मार्गक्रमण करणारास म्हणजे नित्यनेमाने, निष्कामभावाने, निरहंकारपणे नामयुक्त ध्यान करणारास देव भेटतो. म्हणूनच श्रीशंकरही अद्याप नामजपयुक्त ध्यान करीत आहेत, असे श्रीज्ञानदेवांनीही 'ज्ञानेश्वरी'त म्हटले आहे.

**४) श्रीसद्‌गुरुंशिवाय सुखशांती नाही -**

चौदा विद्या व चौसष्ट कला आहेत. त्या सर्व वा त्यांतील काही जरी प्राप्त असल्या तरी माणूस सुखी समाधानी होऊ व राहू शकत नाही. कारण, श्रीसद्‌गुरुंच्या कृपेने मिळणारे आत्मज्ञान त्याला झालेले नसते. आत्मज्ञानाशिवाय असलेल्या त्या साऱ्या विद्या व कला केवळ पैसा, संपत्ती व नावलौकिक मिळवून देणाऱ्या असतात; खरी सुखशांती देणाऱ्या नसतात. त्यांच्या साह्याने मृत्यूचे भय हटविणारे आत्मज्ञान होऊ शकत नाही. म्हणूनच श्रीरामदासांनी त्यांना 'पोटविद्या' व 'आत्मज्ञानविरहित करमणूक' म्हणून अवमानिले आहे. श्रीसद्‌गुरू हे शिष्यांना आत्मज्ञान प्राप्तीसाठीची साधना शिकवितात व करवूनही घेतात. परिणामी, सत्शिष्य सुखी, समाधानी व शांत असतो व राहतो.

**५) श्रीसद्‌गुरू हेच महान दाता होत -**

श्रीसद्‌गुरुंचे व सत्शिष्याचे लक्षण सांगताना 'गुरुसमान दाता व शिष्यासमान याचक नाही' असे विधान श्रीकबीर यांनी केले आहे. त्या दोह्यातच पुढे सद्‌गुरू हे सत्शिष्यास त्रैलोक्याची संपत्ती दान करतात, असे त्यांनी म्हटले आहे. 'तिन्ही लोकांची संपत्ती सत्शिष्यास मिळते' हे त्यांचे शब्द मोठे गूढ आहेत. स्वर्ग, मृत्यू व पाताळ हे तीन लोक आहेत. ते पंचमहाभूतांपासून बनलेले आहेत. विश्व ज्यांच्यापासून बनलेले आहे ती पंचमहाभूतेही मुळात, या लेखांचे सुरुवातीस सूचित केल्याप्रमाणे, अविनाशी असा आत्मा होय. अर्थात सर्व विश्वात सर्वत्र एक विश्वंभरच म्हणजे आत्मारूपी देवच भरून उरलेला आहे. 'ज्ञानेश्वरी'त म्हटल्याप्रमाणे श्रीसद्‌गुरू कृपेमुळे तो सत्शिष्य आत्मदेवरूपी आपणच हे चराचर विश्व झालेलो असल्याचे अनुभवतो. तिन्ही लोकांवर जशी देवाची सत्ता व मालकी असते, तशीच सत्ता व मालकी त्या विनम्र व पूर्णतः अहंभावरहित असलेल्या सत्शिष्यास प्राप्त होते. उदाहरणार्थ सर्व संत श्रीनामदेव, श्रीतुकाराम व श्रीबहीणाबाई यांनीदेखील श्रीसद्‌गुरुकृपेने आपण देव झालो आहोत व 'सर्व सत्ता आपल्या हातीं आली' आहे, असे म्हटले आहे.

**६) श्रीसद्‌गुरू हे ॐकारस्वरूप असतात -**

संत श्रीएकनाथ यांनीदेखील आपल्या अनेक अभंगांमधून श्रीसद्‌गुरुंचे स्वरूप व माहात्म्य वर्णिले आहे. 'ॐकारस्वरूपा सद्‌गुरुसमर्था' असे त्यांनी एका अभंगारंभी म्हटले आहे. अर्थात, श्रीसद्‌गुरू हे ॐकारस्वरूप म्हणजे ॐकाराचेही मूळ असतात. असे सद्‌गुरू म्हणजे खरे गुरू हे इतर गुरुंपासून कसे वेगळे असतात ते श्रीकबीर यांनीही स्पष्ट केले आहे. वेगवेगळ्या विद्या व कला शिकविणारे तसेच देव भेटावा म्हणून करावयाच्या प्रयत्नांबाबत उपदेश करणारे अनेक गुरू असतात. खरे तर, त्यांना स्वतःलाच आपले व देवाचे खरे स्वरूप अवगत वा ज्ञात झालेले नसते; त्यामुळे ते देवप्राप्तीसाठी स्वतःला योग्य वाटणारे असे मंत्रतंत्रयुक्त विविध मार्ग सांगत राहतात. अर्थात, त्यांच्या व त्यांच्या शिष्यांच्याही मनात अपेक्षा, आशा व महत्त्वाकांक्षायुक्त म्हणजे सकाम भाव असतात. अशा

व्यक्ती सद्वस्तुचे म्हणजे देवाचे दर्शन घडविण्यास असमर्थ असतात,ते सद्‌गुरू नसतात व म्हणूनच ते वंदनीय नसतात; याउलट, जे मूळ 'शब्द' दाखवून देऊ शकतात तेच खरे सद्‌गुरू म्हणून वंदनीय असतात, असे श्रीकबीर यांनी म्हटले आहे. शब्द म्हणजे ॐकार होय. आपल्या प्रत्येकाच्या देहात ॐकार वा प्रणव आहे. तो अनुभवास यावा म्हणून ('ज्ञानेश्वरी'त म्हटल्याप्रमाणे) आपल्या 'प्राणांचा प्रणव करण्याची' रीत शिकविण्याचे सामर्थ्य ज्या श्रीसद्‌गुरुंच्या ठिकाणी असते त्यांना सदैव वंदन करावे, असे श्रीकबीर यांनी म्हटले आहे. त्यांच्या त्या दोह्याचा भावानुवाद असा आहे -

**भेद गुरुगुरूत असती, भिन्न भावविचार ।**
**वंदावे हो त्यासी देहीं दावी जो ॐकार ।।**

आपल्या गुरुंनी आपल्याला आपल्या देहातच प्रणवाचा अनुभव घ्यावयास शिकविले, अकार, उकार मकार इत्यादी ॐकाराचे वा प्रणवाचे भेद आपल्या देहातच उकलावयास म्हणजे सानुभव समजून घेण्यास शिकविले, असे संत श्रीज्ञानदेवांनीदेखील काही अभंगातून सांगितले आहे.

**७) श्रीसद्‌गुरू हे साक्षात परब्रह्म असतात -**

**'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः । गुरु साक्षात परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ।।'** या श्लोकातून गुरुंच्या म्हणजे श्रीसद्‌गुरुंच्या स्वरूपाची व माहात्म्याची कल्पना येते. सृष्टी निर्माण करणारा ब्रह्मदेव, तिचे पालन करणारा विष्णू व सृष्टीचा संहार करणारा महादेव यांनाही ज्या देवाधिदेवाने निर्माण केले आहे त्याचे स्वरूप 'परब्रह्म' या शब्दाने सूचित केले आहे. हा देवाधिदेवच स्वधर्माची शिकवण देण्यासाठी अवतार घेत असतो. त्याचे ते दिव्य जन्मकर्म जाणणारे व त्याच्याशी एकरूप झालेले संतही त्याच्याबरोबर किंवा नंतर जन्म घेत असतात. अर्थात, देवाचे अवतार व संत हे स्वरूपतः परब्रह्म असतात. माणसांसारखे दिसत असले तरी ते सामान्य माणसांप्रमाणे स्वरूपाबाबत अज्ञानी नसतात, सामान्य माणसांप्रमाणे ते मायाधीन वा गुणाधीन नसतात; तर, ते मायेचे नियंते असतात, गुणातीत असतात, अखंड ज्ञानी वा सर्वज्ञ असतात. थोडक्यात, देवाप्रमाणेच संत सद्‌गुरू हे परब्रह्माच्या सर्वोत्तम अशा सजीव सगुण मूर्ती असतात.

संतसद्‌गुरू हे ब्रह्माहून वा परब्रह्माहूनही श्रेष्ठ असतात, असे पटवून देताना समर्थ श्रीरामदास स्वामी यांचे सत्शिष्य श्रीदिनकरस्वामी यांनी ब्रह्म व सद्‌गुरू यांच्यातील फरक सांगितले आहेत. ते समजून घेताना 'श्रीसद्‌गुरू हे साक्षात परब्रह्म असतात' म्हणजे काय ते आपल्याला थोडे थोडे समजू लागते. म्हणून तेही नंतर पाहूयात. तर, 'स्वानुभवदिनकर' या ग्रंथात ते म्हणतात,

**८) परब्रह्माहुनी श्रेष्ठ।श्रीसद्‌गुरू समर्थ ।।**

श्रीसद्‌गुरू म्हणजे सर्वेश्वर होय. त्यांच्याठायी असलेल्या गुणांना मर्यादा ती कशी असू शकेल? तथापि जगाचा उद्धार करण्यासाठी ते मनुष्यवेष धारण करतात. त्यांची कृपादृष्टी झाली की शरणागत सत्शिष्य ब्रह्मरूप होऊन सृष्टीत वावरू लागतो; आकारास येणे व निराकार होणे या गोष्टी त्याच्यासाठी उरलेल्या नसतात; कारण, त्या समूळ मिथ्या आहेत, असे तो अनुभवत असतो. श्रीसद्‌गुरुंची प्रकृती मानुषी म्हणजे माणसासारखी दिसत असली तरी त्यांच्या ठिकाणी अमानुष म्हणजे अनंत, अमर्याद सामर्थ्य असते. त्यांच्या केवळ कृपाकटाक्षामुळे जीवास ब्रह्मरूप प्राप्त होते.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

ब्रह्मसाक्षात्कारी असे ते महापुरुष असतात, स्वयंप्रकाश असे ते साक्षात अवतार असतात, त्यांच्या वाणीद्वारे स्वतः जगदीश अध्यात्माचे सारासार बोललेला असतो व बोलत असतो. त्यांचे बोलणे हे पूर्णतः प्रचीतियुक्त, यथार्थ स्वानुभवयुक्त असते; आत्मानुभवसंपन्न असे ते सर्व शास्त्रांचा अर्थ स्थापन करीत असतात व त्या अर्थांचे शिष्यांच्या अंतःकरणात उत्थापनही करीत असतात (अर्थात त्याप्रमाणे सत्शिष्यांना अनुभव येतो व त्याप्रमाणे ते आचरणही करू लागतात). त्यांची वाणी सुगम व शुद्ध व्याकरण तात्पर्याची खाण असते, त्यांच्या स्वाभाविक चर्चांमधून परम पदांची श्रेणी सहजपणे व्यक्त होत असते. (अर्थात, त्यांच्या सहज चर्चेमधून शिष्यांना परमपद प्राप्तीपर्यंत करावयाच्या प्रगतीचे टप्पे समजून येत असतात). कर्मकांड, उपासनाकांड व ज्ञानकांड ही अतिप्रचंड अशी तीन कांडे (प्रकरणे) होत; पण हे पूर्वपक्ष आहेत असा निवाडा करून म्हणजे ही तिन्ही कांडे फार अलीकडची असून शिष्यांनी त्यांच्याहीपलीकडे जाऊन जी परमपदप्राप्ती करून घ्यावयाची असते त्याबाबतचा सिद्धान्त ते स्थापन करतात म्हणजे शिष्यांना त्याबाबतचा निस्संदिग्ध बोध करून देतात. श्रीसद्गुरू हे सदैव परब्रह्मरूप असतात किंवा या चराचराचे ते दैवच म्हणजे भविष्यच असतात (म्हणूनच, उदा. 'सद्गुरुनाम ठिकाना है', असे सन्मार्गदर्शक विधान संत श्रीकबीर यांनी करून ठेवले आहे.); शरण आलेल्याचे ते गौरव असतात म्हणजे त्यांच्या कृपाप्रसादाने प्राप्त करून घ्यावयाचे असे ते सर्वश्रेष्ठ गौरवास्पद स्थान असतात.

**९) परब्रह्म व श्रीसद्गुरू यांच्यातील फरक -**

मानवी मनाच्या मर्यादा लक्षात घेऊन देवानेच गुरुशिष्य परंपरा सुरू करून आजपर्यंत अबाधित ठेवली आहे. यामागील कारण परब्रह्म व श्रीसद्गुरू यांच्यातील पुढील फरक समजून घेताना लक्षात येते. -

ब्रह्माला स्पर्श करता येत नाही म्हणजे ते स्पर्शाने ठाऊक होत नाही; श्रीसद्गुरुंना मात्र दोन्ही हातांनी आलिंगन देता येते; म्हणून ब्रह्मास पहावे असे ज्यास वाटत असेल त्याने श्रीसद्गुरुंना अवलोकावे, त्यांचेकडे मोठ्या आदराने, परम सद्भावयुक्त होऊन पहावे. ब्रह्मास पाहू गेले असता परादि चारी वाणी निवर्ततात म्हणजे या वाणींची हालचाल बंद पडते; याउलट श्रीसद्गुरुंची स्तुती, प्रशंसा वाणीने करता येते, श्रीसद्गुरुंशी प्रेमप्रीतियुक्त असा सुखसंवाद मोठ्या आनंदाने करता येतो. ब्रह्मास पाहू गेलेला भक्तजीव ब्रह्मच होऊन जातो. त्यामुळे ब्रह्माची भक्ती करिता येत नाही; याउलट, श्रीगुरुंचे नाना प्रकारे भजन करता येते. ब्रह्मस्वरूपीं काही श्रवण करण्याची सोय (परिस्थिती) उरत नसते; याउलट, श्रीसद्गुरुंचे वाक्य सदैव कानीं पडत असते, (त्यांची प्रवचने आपण ऐकू शकतो). ब्रह्मस्वरूप झाल्यावर कथा कीर्तन करता येत नाही; याउलट श्रीसद्गुरुंच्या माहात्म्याबाबत अनेक उद्बोधक गोष्टी सांगता येतात तसेच त्यांची कीर्तीही गाता व सांगता येते. ब्रह्मरूप झाल्यावर स्मरण व चिंतन करता येत नाही; याउलट, श्रीसद्गुरुंचे सदैव स्मरण करता येते. ब्रह्मस्वरूपीं पादसेवनभक्ती घडत नाही; याउलट श्रीगुरुंची पाद्यपूजा अभिव्यक्त होते. अर्चनवंदनादि भक्तिप्रकारयुक्ती ब्रह्मस्वरूपीं सर्वथा चालत नाहीत. चतुर्विध अन्नादि खाद्य नैवेद्य तसेच आपल्या आवडीप्रमाणे उत्तम पक्वान्ने श्रीगुरुंकडून अंगिकारिली वा स्वीकारली जातात. अशाप्रकारे ब्रह्माहून श्रीगुरू हे अनंत गुणांनी

श्रेष्ठभावयुक्त असल्याचा प्रत्यय येत असतो. शिष्याने कायावाचामनें श्रीगुरुंना शरण जावे म्हणजे मग श्रीगुरू कृपा करतात व त्यास ब्रह्मानुभव घडतो. श्रीगुरुंचा हस्त शिष्याच्या मस्तकी पडतो किंवा श्रीगुरू जेव्हा आपला हात शिष्याच्या मस्तकीं ठेवतात तेव्हा त्याच्या अष्ट देहांचा निरास होतो व ते 'तत्वमसि', 'अयमात्मा ब्रह्म' आदि महावाक्यउपदेश करतात व शिष्यास आपण ब्रह्मच असल्याचा अनुभव घडतो. पण तोही अनुभव तेव्हाच घडतो जेव्हा श्रीगुरुंची पूर्ण कृपा होते आणि शिष्य श्रीगुरुंच्या उपदेशावर पूर्ण विश्वास ठेवून साधनारत राहिलेला असतो.

म्हणून परब्रह्माहूनही अनंतपटीने श्रीसद्‌गुरू समर्थ वा श्रेष्ठ आहेत, असे म्हणणे यथार्थ होय. संतसज्ञनांनी माझ्या या वचनाला कृपया दूषण देऊ नये, ही विनंती. कारण, पहा की ब्रह्मासी सख्य कसे बरे करता येईल? श्रीसद्‌गुरुंसी मात्र हितगुज करता येते. आपला देह श्रीगुरुचरणीं समर्पित करून आत्मनिवेदनही करता येते. अशाप्रकारे नवविधप्रकारे श्रीसद्‌गुरुंची पूजाअर्चा करता येते की जी ब्रह्मस्वरूपीं करता येत नाही. म्हणूनच ब्रह्माहून श्रीगुरू अनंत गुणांनी श्रेष्ठ आहेत, (असे विधान मी केले आहे.) माया, जीव, ईश्वर इत्यादिंचा प्रभव कसा होतो त्याचा किंवा परब्रह्माचा अनुभव श्रीगुरुंच्या मुखातून निघणाऱ्या वाणीद्वारेंच शिष्यास येत असतो. पाहू जाता, ब्रह्म हे केवळ निर्गुण होय तर सद्‌गुरू हे 'सगुण असोनि निर्गुण' असतात. श्रीसद्‌गुरू वाच्यांश व लक्ष्यांश यांच्यात असल्यासारखे भासतात म्हणजे यांचा वापर ते करीत असतात पण त्याहूनही ते संपूर्णतः वेगळे असतात. श्रीसद्‌गुरू हे सुखसाम्राज्य सोहळा असतात तर ब्रह्म हे सुखातीत चित्कळा असते; म्हणून ब्रह्माहून अनंत गुणांनी श्रीसद्‌गुरू हे आगळे असतात. ब्रह्म हे नामरूपकर्मविगळे असते तर संत सद्‌गुरू पंचविध त्रिपुटीमाजी असूनही निराळे (नामरूपकर्मातीत) असतात; अशाप्रकारे, संत, सज्ञन व सद्‌गुरू हे सर्वथैव मूर्तिमंत परब्रह्म असतात. (टीप : हा 'श्रीस्वानुभवदिनकर, कलाप ४, किरण ३मधील' काही ओव्यांचा भावानुवाद आहे.)

**- डॉ. विजय बाणकर,**

फ्लॅट क्रमांक बी-११०९,

ग्रासलँड हाऊसिंग सोसायटी,

कोल्हेवाडी, सिंहगडरोड,

पुणे - ४११०२४.

***



### संतांचे ग्रंथ हेच सदगुरू

महाराष्ट्रातील हजारो खेड्यापाड्यांत व शहरातही अखंड हरिनाम सप्ताह होतात. त्यात ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण होते. हजारो भाविक यात सहभागी होतात. ज्ञानेश्वरीचे पूजन करून पारायणास सुरुवात होते व शेवटच्या दिवशी ज्ञानेश्वरीचा ग्रंथ डोक्यावर घेऊन मिरवणूक व महाप्रसाद भोजनाने पारायण सप्ताहाची समाप्ती होते. शेकडो वर्षांपासून अत्यंत भाविकपणे ह्या ग्रंथाचे पारायण केले जाते. हा ग्रंथ डोक्यावर घेऊन नाचण्याचा आहे, तसाच तो आयुष्यभर वाचन, चिंतन, मननाचा आहे. अभ्यास करून तसे आचरण करण्याचा आहे. म्हणून या ग्रंथाचे पारायण करतात ते भाग्यवान आहेत.

**- नामदेव सदावर्ते**

**यो**गगुरू, ध्यानगुरू आणि आध्यात्मिक गुरु आज भारतभार प्रकट होत आहेत. यात काही देवीयात काही देवीमाता, गुरुमाँ, गुरुमैया आहेत. विविध दूरदर्शन वाहिन्यांवर त्यांचे रोज दर्शनही घडत असते. भाविकांच्या प्रचंड गर्दीसमोर त्यांचे सत्संग चालू असतात. भव्य मंडप, आकर्षक रंगमंच व स्त्री-पुरुषांची प्रचंड गर्दी असा त्या सत्संगांचा थाटमाट दिसतो. हे सारे पाहता समृद्ध, संपन्न भारतीय संस्कृती व हिंदू तत्त्वज्ञानाबद्दल विदेशी लोकांना आश्चर्य वाटत असेल. तसे आपले गुरू आणि गुरुमाता विदेशातही जाऊन सत्संग करतात. त्यामुळे अध्यात्मिक गुरूजनांना विदेशातील ऐहिक ऐश्वर्याचा व सौंदर्याचा सुखोपभोग अनुभवयास मिळतो. अशा परदेशात जाऊन आलेल्या फॉरेन रिटर्न गुरुमहाराजांचेही येथे महात्म्य वाढते. परदेशात त्यांनी केलेल्या चमत्कारांचे मार्केटिंगही होते.

या गुरूंमुळे भारतीय योग, अध्यात्म व परमार्थ खूप सहज, सुलभ, सोपा व तात्काळ प्राप्त होणारा झाला आहे. ज्ञानदेवांना जो योग अनेक जन्मांतील तपश्चर्येमुळे प्राप्त झाला, तो योग आजचे गुरू दीक्षामात्रे प्राप्त करून देतात. केवळ डोळ्याला डोळा भिडवून हे गुरू योगदीक्षा देतात. कुंडलिनीशक्ती एक तासात प्राप्त करून मिळेल, असा प्रचार केला जातो. अशा फसव्या जाहिराती छापून प्रसारित केल्या जातात. ब्रह्मचर्याचे कडक पालन करून अनेक प्रकारे शरीर कष्टवून, व्रतनियमांची कठोर साधना करून जे योगसामर्थ्य पूर्वी प्राप्त होत असे, ते केवळ प्रचंड संपत्तीच्या रूपात देणग्या देऊन गुरुदीक्षा घेताच प्राप्त होत असेल, तर चमत्कारच मानावा लागेल.

अशा या श्रीमंत गुरूंच्या ठायी भक्तांची अंधभक्ती पाहता त्या भोळ्या भाविकांची कीव येते. आपल्या या महाराष्ट्रात शेकडो समाजसुधारक नाहक कंठशोष करून गेले असे वाटते. एखाद्या गुरूच्या चरणी आपले सारे ज्ञान, संपत्ती व स्वाभिमान अर्पण करणारी सुशिक्षित, श्रीमंत मराठी माणसं पाहून दुःख होते महाराष्ट्रातील साऱ्या संतांनी सद्‌गुरूंची जी लक्षणे सांगितलेली आहेत, त्यांपैकी एकही लक्षण नसलेल्यांना श्रीमंत, जाहिरातबाज, दूरदर्शनाधिष्ठित तसेच राजकारण्यांचा वरदहस्त लाभला असल्याने कायद्यालाही न घाबरणाऱ्या अध्यात्मिक गुरूंच्या चरणी आपली अक्कल गहाण

ठेवणाऱ्या भाविकभोळ्यांनी थोडातरी संतवाङ्मयाचा विचार करावा. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम व रामदास स्वामींचे विचार वाचावेत. संतचरित्राचा, संतांच्या अभंगांचा त्यांनी सांगितलेल्या सूचनांचा थोडा तरी आपल्या जीवनात वापर करावा. म्हणजे धार्मिक भ्रष्टाचारापासून दूर राहून जीवन सार्थकी लागेल. तसेच बुवाबाजी करणाऱ्या आधुनिक शुक्राचार्यांकडून फसवणूक होणार नाही. आपले कुटुंब व मुलाबाळांना तरी अशा अंधश्रद्धाधारी ढोंगी बुवांपासून दूर ठेवावे.

सामान्य संसारी जन विविध समस्यांनी ग्रासलेले असतात. त्यामुळे त्यांच्यामध्ये वैचारिक व मानसिक गुलामगिरी आणि लाचारी बळावते. थोड्याशा संसारीक तापाने खचून होताच त्यातून मार्ग काढण्यासाठी ज्योतिष्यादि बुवाबाजीकडे आकर्षिले जातात व फसतात. धर्मगुरूसुद्धा त्यांना धैर्याने सामना करण्याचे न सांगता कोणत्यातरी ग्रहाची शांती व इतर पूजाविधी करण्यास सांगतात. त्यामुळे मानसिक अस्वस्थ असलेला तो गृहस्थ पूजाविधीसाठी लागणारे पैसे नसतील तर कर्ज काढतो व विधी करतो. पूजाविधीनंतर तो आणखी एका आर्थिक संकटात सापडतो.

एवढी सारी फसवणूक करून घेण्यापेक्षा रोज सकाळी देवपूजेनंतर हरिपाठ वाचावा. दिवसभर वेळ मिळताच त्या वेळी हरिपाठातील एखाद्या ओवीचे चिंतन करावे. सायंकाळी झोपण्यापूर्वी ज्ञानेश्वरीच्या काही ओव्या वाचाव्यात. एखाद्या ओवीचे चिंतन करीत शांत झोपावे. तुम्ही म्हणाल असे काय आहे हरिपाठ, ज्ञानेश्वरीत? अध्यात्मिक, धार्मिक फसवणूक टाळण्याचे सामर्थ्य आहे!

अध्यात्मज्ञानाचे दुकान मांडून बसायचे आणि प्रचंड धन-संपत्ती गोळा करून ऐशोआरामात मजा करीत जगायचे. देवधर्माच्या नावाखाली श्रीमंतांप्रमाणे गोरगरीबांनाही नाडण्याने स्वार्थ साधता येतो. आज सर्वत्र भोळ्या भाविकांचे सर्व प्रकारे शोषण करण्याचे काम धर्ममार्तंड करीत आहेत. त्यांच्यापासून फसविले जाण्यापेक्षा संतविचार ऐकावे.

संत तुकोबा एका अभंगात म्हणतात, मी सर्वांच्या पायांवर मस्तक ठेवून विनंती करतो की, मनेकायावाचे, धनसंपत्ती देऊन योगसाधना करून फसण्यापेक्षा माझ्या दुकानात या. मी माझ्या धन्याचे भांडार फोडून हा माल आणला आहे. तसा मी भारवाही हमालच. पण खूप देशोदेशी फिरून हा माल आणलेला आहे. असा कल्याणकारी माल कुठे मिळणार नाही. सर्व कसोट्यांवर घासून हा माल मी देतो आहे. तुम्ही हा माल घ्याल तर सुखी व्हाल. जीवाचे, नरदेहप्राप्तीचे सार्थक होईल.

**तुका म्हणे सोपे आहे सर्वाहुनी।**<br>
**शहाणा तो धनी घेतो येथे।।**<br>
**अहो श्रोते वक्ते सकळही जन।**<br>
**बरे पारखून बांधा गाठी।।**<br>
**फोडिले भांडार धन्याचा हा माल।**<br>
**मी तव हमाल भारवाही।।**

तुकोबा म्हणतात- कुणाचेही काही ऐकू नका. देवासाठी रानावनात जाऊ नका. योगात गुरफटू नका आणि त्याच्या फंदात पडू नका. फक्त भगवंताचे शुद्ध मनाने नामस्मरण करा. आईच्या खांद्यावर मान

टाकून बालक जसे निश्चिंत राहते, त्या बालकाची काळजी आई घेते. तसे देवाच्या सान्निध्यात राहून आपले कर्तव्य करीत शांतपणे, निर्भयपणे जगावे. यात ते शेवटी म्हणतात-

**तुका म्हणे नको पुसो वेळोवेळा।**

**उपदेश वेगळा उरला नाही।।**

केवळ हरिचिंतनामुळे सारे मायाजाळ तुटतील. जेथे सर्वस्वाची हानी होते अशा मायामोहात फसू नका. क्षणिक मोहाला भुलू नका. या मोहमयी जगात तुमच्या अज्ञानाचा, दुबळेपणाचा, भोळेपणाचा फायदा घेऊन तुम्हाला फसवणारे व तुमचे शोषण करणारे पदोपदी दुकाने थाटून बसलेले आहेत.

**आणीक नका पडू गबाळाचे भरी।**

**तेथे आहे थोरी नागवण।।**

महाराष्ट्रातील हजारो खेड्यापाड्यांत व शहरातही अखंड हरिनाम सप्ताह होतात. त्यात ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण होते. हजारो भाविक यात सहभागी होतात. ज्ञानेश्वरीचे पूजन करून पारायणास सुरुवात होते व शेवटच्या दिवशी ज्ञानेश्वरीचा ग्रंथ डोक्यावर घेऊन मिरवणूक व महाप्रसाद भोजनाने पारायण सप्ताहाची समाप्ती होते. शेकडो वर्षांपासून अत्यंत भाविकपणे ह्या ग्रंथाचे पारायण केले जाते. हा ग्रंथ डोक्यावर घेऊन नाचण्याचा आहे, तसाच तो आयुष्यभर वाचन, चिंतन, मननाचा आहे. अभ्यास करून तसे आचरण करण्याचा आहे. म्हणून या ग्रंथाचे पारायण करतात ते भाग्यवान आहेत. संत नामदेव महाराज या ग्रंथाचे महत्त्व सांगताना म्हणतात-

**गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी।**

**ब्रह्मानंद लहरी प्रकट केली।।**

**अध्यात्मविद्येचे दाविलेसे रूप।**

**चैतन्याचा दीप उजळिला।।**

**छपन्न भाषेचा केलासे गौरव।**

**भवार्णवी नाव उभारिली।।**

अशी ही ज्ञानेश्वरी समजू लागल्यावर श्रवणाच्या निमित्ताने वाचकाजवळ येऊन बसताच जीव साम्राज्यभुवनी सुखी होतो. मात्र, केवळ ज्ञानेश्वरी वाचल्याने पुण्य मिळते हे मानून ज्ञानेश्वरीच्या अर्थाकडे दुर्लक्ष करून वाचू नये. ज्ञानेश्वरी वाचन, श्रवणाने मन शांत व शुद्ध होते. येथूनच भाविकांची आध्यात्मिक प्रगती सुरू होते. ज्ञानेशांची एक एक ओवी म्हणजे खडीसाखरेचा खडा आहे. जसजसा आस्वाद घ्यावा तसतशी ती ओवी गोड लागते. ज्ञानेश्वरीचा वाचक हळूहळू अंतर्मुख होतो. मन श्रद्धावंत व सात्त्विक बनते.

ज्ञानेश्वरी वाचता वाचता काही ओव्या मनाशी भिडतात. त्या आपोआप पाठ होतात. त्या नित्य स्वाध्यायात ठेवाव्या. त्यातून त्या अक्षरांच्या सामर्थ्याचा अनुभव घ्यावा. मनाच्या आरशावरील धूळ नष्ट होऊन मन शांत व शुद्ध होते. स्वतः ज्ञानोबाच आपल्याला ओवीचा अर्थ सांगत आहेत असा अनुभव येतो. चिंतनातून ओवीचा अर्थ समजतो. फक्त ज्ञानोबा माऊलीला शरण जाऊन ज्ञानेश्वरीच्या

ओव्या वाचाव्या. मग अगदी सहज अर्थ समजू लागतो. मन आनंदाच्या झोक्यावर झुलते.

एकदा संतवाङ्मयाची गोडी लागल्यावर ज्योतिष, कर्मकांड, बुवाबाजी, जादूटोणा, करणी, अंगात येणे, नवसादी धार्मिक गैरसमजुती व अंधश्रद्धेकडे दुर्लक्ष होते. संतांनी प्रपंचात राहून परमार्थसाधना केल्यामुळे ते सामान्यांना अधिक जवळचे वाटतात. ते सांगतात ती पूजा-अर्चना कडक नियमांच्या बंधनांनी जखडलेली नसून सहजसाध्य, सोपी व कोणताही आर्थिक भुर्दंड नसणारी आहे. देवाच्या नामस्मरणाला पैसे लागत नाहीत. देव भावाचा भुकेला आहे. प्रेमाचा भुकेला आहे.

संतांनी नामस्मरणाचा सोपा मार्ग सांगितला आहे. प्रेमभक्ती, भावपूर्ण ईश्वरचिंतन मन शुद्ध असेल तर घडते. मनःशांतीसाठी व मन शुद्ध होण्यासाठी ज्ञान, ध्यान व भक्तीचा मार्ग संत सांगतात. पंढरीच्या वारकऱ्याजवळ पंचरत्नी हरिपाठाचे पुस्तक असते. संत ज्ञानदेवांचा हरिपाठ भाविक वारकरी आयुष्यभर रोज नियमित म्हणतात. या संतांच्या हरिपाठात गीता, भागवत, वेद, उपनिषदे यांचा अर्क काढून हरिपाठरूपी सुवर्णकलशात त्यांनी तो भरून ठेवला आहे. ही संतांची संजीवन मूळी आहे. ती प्रापंचिकांना बहुगुणी असून अनमोल आहे.

या हरिपाठात संत ज्ञानदेव सांगतात, शुद्ध अंतःकरणाने, एकाग्र चित्ताने, एकनिष्ठेने नामस्मरण केले, तर तो श्रीहरी नारायण तुमचे संकट निवारण करण्यासाठी धावत येतो.

**न लगती सायास जावे वनांतरा।**
**सुखे येतो घरा नारायण।।**

अठरापगड जातीत विभागलेला बहुजन समाज अज्ञान, अंधश्रद्धा, वर्णभेदादि बंधनांमुळे अध्यात्मज्ञानापासून वंचित होता. असा दुर्बळ, भयग्रस्त, अज्ञानांधकारात धडपडत असलेला समाज पाहून संत कळकळीने त्यांना सांगू लागले. या समाजाला सहज समजावे म्हणून हरिपाठातून संत मार्गदर्शन करतात. ज्ञानाच्या अभावाने या समाजाला धर्म तत्वज्ञान माहिती नव्हते. ही कोंडी फोडून संतांनी सर्व समाजाला मराठी भाषेतून आत्मज्ञान सांगितले. समाजात आत्मविश्वास निर्मा केला. तंनी नामभक्तीचा सर्वजनसुलभ मार्ग सांगितला.

संतांनी बहुजनांमध्ये ज्ञान-ध्यान, नामशक्तीचा प्रसार केला. देव, धर्म, उपासना यासाठी नामजपाची महती सांगितली.

**जाणीव नेणीव भगवंती नाही।**
**हरि उच्चारणी पाही मोक्ष सदा।।**

अशी भक्तिमार्गातील सुलभता संतांनी समाजाला पटवून दिली. नाम-भक्तीचा महिमा गात असताना परमार्थ क्षेत्रात रूढ झालेल्या कर्मकांडाचा निरास संतांनी केला. विविध साधनांच्या मार्गे जाणाऱ्यांना संत सांगतात-

**काया क्लेश करणे शरीर दंडणे।**
**न लगे हिंडणे दाही दिशा।**
**कोण वाहे मंत्र वाऊगी खटपट।**

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

गाऊ निष्कपट रामनाम।।

अस्पृश्य म्हणून समाजाने दूर फेकलेल्या लोकांना संतांनी आपल्यात सामावून घेतले. सोवळ्या-ओवळ्याच्या कल्पनांनी धार्मिकतेत घातलेले बंध नामबळाने काढून टाकले. श्रीरामकृष्णहरी हा मंत्र कुठेही, कसाही, कधीही उच्चारला तरी चालतो. संतांनी भक्तीचा राजमार्ग निर्माण केला. धर्ममार्तंडांनी निर्माण केलेल्या सूक्ष्म व दुस्तर अशा वाटा मोडून संतांनी हा नामभक्तीचा राजमार्ग निर्माण केला. या मार्गावरून चालताना अंधश्रद्धेचे दगडगोटे, खाचखळगे, रक्तबंबाळ करणारे काटे नाहीत. आपल्या धार्मिक जीवनात जर अंधश्रद्धा नष्ट करावयाची असेल, तर संत वाङ्मयाचे, संतांच्या जीवनाचे चिंतन, मनन, आचरण करावे लागेल.

**काय सांगो आता संतांचे उपकार।**
**मज निरंतर जागविती।।**
**तेचि संत तेचि संत, ज्यांचा हेतू विठ्ठल।**
**नेणति काही टाणाटोणा, नामस्मरणावाचून।।**

**-नामदेव सदावर्ते,**
पसायदान बंगला, मानकर मळा,
मखमलाबाद, नाशिक

***



## संत सद्गुरू

संत सद्गुरू हा विषयोपभोगाचा गुलाम नसतो. त्याच्याकडे असलेल्या किंवा नसलेल्या गोष्टींमुळे त्याच्या मनःस्थितीत बदल होत नाही. गरीबी असो वा श्रीमंती, मान असो वा अपमान, यश असो वा अपयश- तो समत्वाने सर्व स्वीकारतो. भगवद्गीतेत वर्णन केलेल्या स्थितप्रज्ञ पुरुषाचे हेच लक्षण आहे. संत सद्गुरूच्या जीवनात करुणा हा महत्त्वाचा गुण असतो. ते सर्व जीवांवर प्रेम करतात. त्यांना स्वतःच्या हितापेक्षा समाजाच्या कल्याणाची अधिक चिंता असते. त्यांच्या कृतीतून लोकहित आणि आत्मोन्नतीचा संदेश मिळतो.

**- बंडोपंत दि. कुलकर्णी**

प्रथम सांगू इच्छितो की जोपर्यंत जीव संतत्व प्राप्त करीत नाही, तोपर्यंत त्या जीवाला सद्गुरू उपाधी प्राप्त होत नाही. सद्गुरू हे कधीही स्वतःची ओळख सद्गुरू म्हणून करून देत नाहीत. गोंदवलेकर महाराज म्हणतात, ज्याच्या सान्निध्यात आल्यावर मन आणि मती फक्त अध्यात्माचा विचार करते व त्या अनुषंगाने रसग्रहण होताना जीवन परिवर्तित होऊन आध्यात्मिक होते, तोच संत सद्गुरू होय. संत सद्गुरूंचा महिमा आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत आणि आजही ऐकत आहोत. महाराष्ट्राची संतपरंपरा ही जगातील एक अद्वितीय आध्यात्मिक परंपरा मानली जाते. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, समर्थ रामदास, संत चोखामेळा, संत जनाबाई अशा असंख्य संतांनी आपल्या जीवनातून आणि साहित्यातून मानवतेला सत्य, प्रेम, भक्ती आणि वैराग्याचा मार्ग दाखविला. त्यांच्या कार्यामुळे समाजात समता, बंधुता आणि ईश्वरभक्तीचे बीज रुजले. परंतु, आजच्या काळात तथाकथित गुरूंमुळे संत सद्गुरू या शब्दाभोवती निर्माण झालेल्या गोंधळामुळे सामान्य माणूस संभ्रमित झालेला दिसतो.

आजकाल बुवाबाजी, तथाकथित बाबा, तथाकथित गुरुदेव, महाराज आणि चमत्कारांचे दावे करणाऱ्या व्यक्तींचे पेव फुटलेले दिसते. त्यामुळे खरा संत सद्गुरू कोण आणि ढोंगी कोण, हा प्रश्न सामान्य माणसासमोर उभा राहतो. अशा वेळी संतांनी सांगितलेली संतलक्षणे समजून घेणे अत्यंत आवश्यक ठरते. संत चोखा महाराज म्हणतात-

**उस डोंगा परी रस नोहे डोंगा ।**
**कायी भुललासी वरलिया रंगा।।**

या अभंगातून महाराजांनी बाह्य रूपावर न जाता अंतःकरणातील गुणांकडे पाहण्याचा उपदेश केला आहे. ऊस वाकडा असला तरी त्याचा रस गोड असतो. त्याचप्रमाणे एखाद्या व्यक्तीचे बाह्य रूप, वेशभूषा किंवा दिखाऊपणा न पाहता त्याचे आचरण, विचार आणि जीवनमूल्ये पाहिली पाहिजेत. दुर्दैवाने आजचा समाज गुणांपेक्षा चमत्कारांकडे अधिक आकर्षित होतो. अमूक महाराजांनी माझी

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

अडचण दूर केली, तमूक बाबांनी मला नोकरी मिळवून दिली, एखाद्या गुरूंनी माझी इच्छा पूर्ण केली अशा चर्चा सहज ऐकू येतात. त्यामुळे आध्यात्मिकतेचा केंद्रबिंदू ईश्वर न राहता व्यक्तीपूजा बनते.

संतांनी मात्र याच्या अगदी विरुद्ध मार्ग सांगितला आहे. नामस्मरण, भक्ती, आत्मपरीक्षण आणि वैराग्य यांच्या साहाय्याने ईश्वरप्राप्ती करावी, असे संत सद्‌गुरू वचन आहे. वैराग्य म्हणजे संसाराचा त्याग नव्हे, तर विषयांबद्दलची आसक्ती कमी होणे. परंतु, आज अनेक लोक आपल्या विषयवासना आणि इच्छा पूर्ण करणाऱ्या व्यक्तीला संत सद्‌गुरू समजू लागतात. हे संतविचारांच्या पूर्णतः विरुद्ध आहे. जो मनुष्याला विषयांच्या मोहातून मुक्त करतो, तोच खरा सद्‌गुरू असतो. विषयांची अधिक आसक्ती निर्माण करणारा नव्हे. संत सद्‌गुरूंचा महिमा हा सामान्य बुद्धीच्या पलीकडील विषय आहे. संत तुकाराम महाराज म्हणतात-

**संतांचा महिमा तो बहु दुर्गम। शाब्दिकांचे काम नाही तेथें।।**

**तुका म्हणे अंगें व्हावे ते आपण। तरीच महिमान येईल कळों।।**

याचा अर्थ असा की संतत्वाचा अनुभव केवळ शब्दांनी समजत नाही. संत झाल्याशिवाय संतांचा खरा महिमा कळत नाही. तरीदेखील संतांनी आपल्या स्वानुभवातून काही लक्षणे सांगितली आहेत. त्या लक्षणांच्या आधारे आपण संतत्व समजून घेण्याचा प्रयत्न करू शकतो. तुकाराम महाराज संताचे वर्णन करताना म्हणतात

**पुण्य पापा ठाव नाहीं सुखदुःखा । हानि लाभ शंका नासलिया ।।**

**जितां मरण आलें आपपर गेलें । मूळ छेदिलें संसाराचें ।।**

**अधिकार जात वर्ण धर्म जात । ठाव नाही सत्य असत्याशीं ।।**

**जन वन भिन्न अचेत चळण । नाही दुजेपण ठावे यांसी ।।**

**तुका म्हणे देह वाहिला विठ्ठलीं । तेंव्हाच घडली सर्व पूजा ।।**

या अभंगात संताचे अत्यंत उच्च स्वरूप वर्णन केले आहे. संत हा सुख-दुःख, लाभ-हानी, जय-पराजय, स्तुती-निंदा यांच्या पलीकडे गेलेला असतो. त्याच्या मनात कोणत्याही प्रकारचा भेदभाव नसतो. जात, धर्म, वर्ण, पद, प्रतिष्ठा या गोष्टी त्याच्यासाठी गौण असतात. त्याला सर्वत्र एकच परमात्मा दिसतो. ज्याच्या मनातील अहंकार नष्ट झाला आहे आणि ज्याने स्वतःचा देहभाव परमेश्वराला अर्पण केला आहे, तोच खरा संत होय. समर्थ रामदास स्वामी देखील सद्‌गुरूंच्या वर्णनात म्हणतात

**आता सद्‌गुरू वर्णवेना। जेथे माया स्पर्शो शकेना।।**

**ते स्वरूप मज अज्ञाना। काय कळे ।।**

पुढे ते म्हणतात-

**सद्‌गुरूसी म्हणावे कल्पतरू। तरी हा कल्पनेतील विस्तारू।।**

**कल्पवृक्षाचा अंगिकारू। कोण करी।।**

समर्थांच्या या ओव्यांमधून सद्‌गुरूंचे स्वरूप किती अमर्याद आहे, हे स्पष्ट होते. शब्दांनी

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

सद्गुरूंचे वर्णन करणे अशक्य आहे. सूर्याला उजेड दाखविण्यासाठी पणती पेटविण्याइतके ते अशक्य कार्य आहे. म्हणूनच संतांचे खरे स्वरूप जाणण्यासाठी त्यांच्या सहवासाचा आणि त्यांच्या विचारांचा अनुभव घेणे आवश्यक असते.

मनुष्याची दृष्टी बहुतांश वेळा विषयसापेक्ष असते. त्याचे लक्ष भौतिक सुखप्राप्तीकडे असते. पैसा, प्रतिष्ठा, आरोग्य, सत्ता, संपत्ती, यश या गोष्टी मिळविण्याची त्याची धडपड चालू असते. त्यामुळे जो त्याच्या या इच्छा पूर्ण करेल, त्याच्याकडे तो आकर्षित होतो. जो त्याला इच्छा-वासना कमी करण्याचा उपदेश करेल, त्याच्याकडे त्याचे लक्ष जात नाही. म्हणूनच अनेकदा चमत्कार दाखविणाऱ्या, गूढ शक्तींचे प्रदर्शन करणाऱ्या किंवा लोकांच्या भावनांचा गैरफायदा घेणाऱ्या व्यक्ती समाजात लोकप्रिय होतात.

परंतु, खरे संत सद्गुरू सिद्धींच्या मोहात अडकत नाहीत. योगशास्त्रात अनेक सिद्धींचा उल्लेख आहे, परंतु संतांनी त्या नेहमीच गौण मानल्या आहेत. कारण सिद्धी अहंकार वाढवू शकतात, तर संतत्व अहंकार नष्ट करते. संतांचे कार्य लोकांना स्वतःकडे आकर्षित करणे नसून ईश्वराकडे नेणे हे असते.

खऱ्या संत सद्गुरूचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांची साधी राहणी. संत सद्गुरूंना कोणत्याही प्रकारच्या वैभवाची अपेक्षा नसते. ते सामान्य माणसाप्रमाणेच जीवन जगतात. काही संत भगवे, पांढरे किंवा इतर विशिष्ट वस्त्र धारण करतात, परंतु त्या वेशामध्ये दिखाऊपणा नसतो. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून सात्त्विकता, शांती आणि करुणा प्रकट होत असते. त्यांच्या सहवासात मन शांत होते, लोभ कमी होतो आणि ईश्वरस्मरण वाढते.

अनेकदा एखादा संतस्वभावी मनुष्य आपल्या आसपासच असू शकतो. तो कोणत्याही मोठ्या आश्रमाचा प्रमुख नसतो, त्याच्याकडे मोठा अनुयायी वर्ग नसतो, तो प्रसिद्धीच्या झोतातही नसतो. परंतु त्याचे जीवन अत्यंत निर्मळ, निस्वार्थ आणि ईश्वरनिष्ठ असते. आपल्या विषयप्रधान दृष्टीमुळे आपण अशा व्यक्तींना ओळखू शकत नाही.

संत सद्गुरू हा विषयोपभोगाचा गुलाम नसतो. त्याच्याकडे असलेल्या किंवा नसलेल्या गोष्टींमुळे त्याच्या मनःस्थितीत बदल होत नाही. गरीबी असो वा श्रीमंती, मान असो वा अपमान, यश असो वा अपयश- तो समत्वाने सर्व स्वीकारतो. भगवद्गीतेत वर्णन केलेल्या स्थितप्रज्ञ पुरुषाचे हेच लक्षण आहे. संत सद्गुरूच्या जीवनात करुणा हा महत्त्वाचा गुण असतो. ते सर्व जीवांवर प्रेम करतात. त्यांना स्वतःच्या हितापेक्षा समाजाच्या कल्याणाची अधिक चिंता असते. त्यांच्या कृतीतून लोकहित आणि आत्मोन्नतीचा संदेश मिळतो. संतांची वाणी लोकांना एकत्र आणते; विभाजन करत नाही. ते द्वेष पसरवत नाहीत, तर प्रेम आणि समन्वय निर्माण करतात.

संत या शब्दातच एक गूढ अर्थ दडलेला आहे. संत म्हणजे सत् या सत्यस्वरूपाशी एकरूप झालेला मनुष्य. काही अभ्यासक संत या शब्दाचा अर्थ सह-अनंत असाही करतात, म्हणजे जो अनंत परमात्म्याशी एकरूप झाला आहे. ज्याच्या ठिकाणी मिथ्याचा अंत झाला आहे आणि ज्याच्या अंतःकरणात शुद्ध ज्ञानाचा प्रकाश प्रकट झाला आहे, तो संत होय. ज्याच्या अंतःकरणात शुद्ध ज्ञानाचा

प्रकाश प्रकट झाल्यावर तिथे फक्त सत्य शिल्लक उरते व त्यास सर्वत्र सत्य दिसते. लोकांना मार्गदर्शन करून तेच सत्य दर्शन करून त्यांना सत्य मार्गावर आणतात. म्हणून संत हे सद्‌गुरू असतात.

आजच्या काळात म्हणूनच विवेकाची आवश्यकता अधिक आहे. एखादी व्यक्ती किती प्रसिद्ध आहे, किती मोठे आश्रम आहेत, किती अनुयायी आहेत किंवा किती चमत्कारांच्या कथा सांगितल्या जातात यावरून संतत्व ठरत नाही. संतत्व ठरते ते त्याच्या निःस्वार्थ वृत्तीवर, समत्वावर, वैराग्यावर, करुणेवर आणि ईश्वरनिष्ठ जीवनावर. म्हणूनच आपण चमत्कारांच्या मागे न लागता नामस्मरणाच्या मार्गावर चालले पाहिजे. संतांनी दिलेला रामकृष्णहरीचा मंत्र, विठ्ठलनाम, हरिनाम, आत्मपरीक्षण आणि सदाचार यांचा मार्ग स्वीकारला पाहिजे. त्याचबरोबर संतांनी सांगितलेल्या लक्षणांच्या आधारे खऱ्या सद्‌गुरूंचा शोध घेतला पाहिजे. अशा निःस्पृह, ज्ञाननिष्ठ आणि ईश्वरभक्त संतांच्या सहवासातून जीवनाला योग्य दिशा मिळते.

जीवनाचे अंतिम ध्येय विषयसुख नसून आत्मशांती आणि ईश्वरप्राप्ती आहे. या मार्गावर चालताना विवेक, श्रद्धा आणि संतविचार यांचा आधार घेतला, तर मानवजन्माचे सार्थक होईल. संतपरंपरेने दिलेला हा अमूल्य वारसा जपणे आणि त्यानुसार आचरण करणे हेच आपल्या जीवनाचे खरे यश होय. रामकृष्णहरी! सद्‌गुरू जंगलीदास माऊली चरणी समर्पित.

**- बंडोपंत दि. कुलकर्णी,**
सोलापूर
जिल्हा न्यायाधीश, पुणे

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## द्वैताची झाडणी गुरुविण ज्ञान

**माउली संत ज्ञानदेवांनी सद्गुरुंची महती 'ज्ञानेश्वरी'सह त्यांच्या स्वतंत्र अभंगरचनांतून वेळोवेळी प्रभावी शैलीत कथन केली आहे. माउलींचे ज्येष्ठ बंधू सद्गुरू संत श्री निवृत्तीनाथ महाराज हे जेवढे पारिवारिक नात्याने ज्येष्ठतेची सोज्वळ-मायाळू भूमिका समर्थपणे सांभाळून होते, तितक्याच समर्थपणे आध्यात्मिक नात्याने अन् अनुभूतीने संत ज्ञानदेवांना मार्गदर्शक गुरू म्हणून प्रेरणास्थान ठरले, हे अवघ्या विश्वाला ठाऊक आहे.**

**-डॉ. सुनील शिंदे**

**भा**रतीय अध्यात्म परंपरेतील सद्गुरुंचे स्थानमहात्म्य असाधारण आहे. वेद-पुराण, श्रुती, रामायण-महाभारत महाकाव्ये, तत्वज्ञान, संत साहित्य अशा अनेकविध घटकांतून गुरुमहिमा कथन झालेला दिसेल. वारकरी पंथ तसेच संतांच्या अभंगवाणीतून गुरूमहात्म्य वर्णिले गेले, आदरपूर्वक मान्यता पावले आहे.

माउली संत ज्ञानदेवांनी सद्गुरुंची महती 'ज्ञानेश्वरी'सह त्यांच्या स्वतंत्र अभंगरचनांतून वेळोवेळी प्रभावी शैलीत कथन केली आहे. माउलींचे ज्येष्ठ बंधू सद्गुरू संत श्री निवृत्तीनाथ महाराज हे जेवढे पारिवारिक नात्याने ज्येष्ठतेची सोज्वळ-मायाळू भूमिका समर्थपणे सांभाळून होते, तितक्याच समर्थपणे आध्यात्मिक नात्याने अन् अनुभूतीने संत ज्ञानदेवांना मार्गदर्शक गुरू म्हणून प्रेरणास्थान ठरले, हे अवघ्या विश्वाला ठाऊक आहे.

संत निवृत्तीनाथ आध्यात्मिक क्षेत्री खरे सोज्वळ दीपक! ज्येष्ठतम प्रभावी तत्ववेत्ते आणि तितकेच मायाळू व्यक्तित्व. त्यांचे बंधू आणि सर्वार्थाने गुणी शिष्योत्तम म्हणून माउली संत ज्ञानदेवदेखील तेवढ्यात तोलामोलाचे यथार्थ सत्पात्र शिष्य! माउली विलक्षण विनयशील अन् अपार सोज्वळ-सालस-मृदूभाषी योगिया. संत ज्ञानदेवांना आत्मज्ञान तसेच योगमार्गाचे रहस्य सद्गुरू संत निवृत्तीनाथांनी खऱ्या अर्थाने समजावले.

नाथ आणि वारकरी संप्रदायाचे प्रवर्तक म्हणून निवृत्तीनाथांचे जसे महत्त्व, तसेच ज्ञानदेवांचे आध्यात्मिक गुरू ही अनमोल ओळख. तेराव्या शतकातील निवृत्तीनाथांची कारकीर्द लक्षणीय म्हणावी लागेल. १२६८ किंवा १२७३ हे संत निवृत्तीनाथांचे जन्मवर्ष सांगण्यात येते.

संत निवृत्तीनाथांच्या प्रेरणेने-आज्ञेनुसार माउली ज्ञानोबारायांनी संस्कृतातील गहन आध्यात्मिक तत्वज्ञान सर्वसामान्यांच्या माय मराठीत आणले आणि 'भावार्थदीपिका' अर्थात् 'ज्ञानेश्वरी'चा उदय झाला, जन्म झाला. हाच तो मराठी भाषा तसेच वारकरी संप्रदायाचा पाया गणला जातो. संस्कृतातील मूळ गीता तर्कशुद्ध भाष्य रुपात गीताटीका होऊन 'ज्ञानेश्वरी' स्वरूपात प्रकट झाली ती गुरुदेव निवृत्तीनाथांचे गुणी शिष्योत्तम माउली ज्ञानोबारायांच्या माध्यमातून, हा खरा नियोजित सुकृत दैवी

योग!

गुरुशिष्य परंपरेतील निवृत्ती-ज्ञानोबांचे अद्वैत खरे असामान्य आणि अजरामर! माउलींचा 'अमृतानुभव' हा अनमोल असा दुसरा ग्रंथ देखील सद्गुरू निवृत्तीनाथांच्या आशीर्वादाचे मधुरतम फळ. श्री गुरुदेव निवृत्तीनाथांचे प्रेरणादायी वचन हे तर प्रेमळ अमृतच, अशी माउलींची भावना! एकाग्र स्वस्थ चित्त मन असावे असे प्रतिपादन करतात माउली. संत सज्ञनांची प्रचिती हीच मार्गदर्शक. गुरूज्ञान-मार्गदर्शन केवढे भाग्यशाली, याबाबतचा संत ज्ञानदेवांच्या हरिपाठातील पुढील दाखला पुरेसा प्रेरणादायी आहे.

**नित्य पाठ करी इंद्रायणीतीरीं।**
**होय अधिकारी सर्वथा तो।।२।।**
**असावें एकाग्रीं स्वस्थ चित्त मनीं।**
**उल्हासेंकरूनी स्मरण जीवी।।३।।**
**अंतकाळी तैसा संकटाचे वेळीं।**
**हरि त्या सांभाळी अंतर्बाह्य।।४।।**
**संतसज्ञनांनी घेतली प्रचीति।**
**आळसी मंदमति केवीं तरे ।।५।।**
**श्रीगुरू-निवृत्तिवचन तें प्रेमळ।**
**तोषला तात्काळ ज्ञानदेव ।।६।।**

रामकृष्णी मन जितके तोलामोलाचे तेवढेच सद्गुरुंकडून लाभणारे ज्ञान अनमोल, ही आहे माउलींची पावन धारणा. सगुण ध्यानी असणे तसेच प्रपंचाचे मौन नामपाठ काय, याबाबतही माउलींचे भाष्य मार्मिक आहे. द्वैताची झाडणी तसेच गुरुवीण ज्ञान यावरील माउलींचे विश्लेषण थक्क करणारे. मूळ हरिपाठात तर माउलींनी गुरुदेव संत निवृत्तीनाथांचे हे प्रेरक-तारक मार्गदर्शन सुरेख उल्लेखिले आहे. गुरूज्ञानाचा हा संदर्भ पुढीलप्रमाणे व्यक्त झाला आहे -

**विष्णुविण जप व्यर्थ त्याचें ज्ञान।**
**रामकृष्णीं मन नाहीं ज्याचें।।१।।**
**उपजोनी करंटा नेणें अद्वय वाटा।**
**रामकृष्णीं पैठा कैसेनी होय।।२।।**
**द्वैताची झाडणी गुरुविण ज्ञान।**
**तया कैचें कीर्तन घडे नामीं।।३।।**
**ज्ञानदेव म्हणे सगुण हें ध्यान।**
**नामपाठ मौन प्रपंचाचे।।४।।**

कीर्तनी सेवा अर्थात् कीर्तनी भाव असणे हा झाला ध्यानी असण्याचा पहिला टप्पा. नामपाठ तर कलियुगी केव्हाही श्रेष्ठच. मात्र, यामागील सद्गुरुंची कृपा अधिक मौल्यवान. हरिपाठाची कीर्ती

माउली तुल्यबळ समजतात. हरिपाठाने तर अवघा देह पावन व्हावा, एवढे हरिपाठाचे स्थान महात्म्य. गुरू निवृत्तीनाथांच्या कृपेने लाभलेल्या गूढगम्य ज्ञानाची प्रचिती माउली कशी व्यक्त करतात पहा-

**हरिपाठकीर्ति मुखें जरी गाय।**
**पवित्रचि होय देह त्याचा।।१।।**
**तपाचे सामर्थ्ये तपिन्नला अमूप।**
**चिरंजीव कल्पकोटि वैकुंठीं नांदे।।२।।**
**मातृपितृभ्राता सगोत्र अपार।**
**चतुर्भुज नर होऊनि ठेले।।३।।**
**ज्ञान गूढ गम्य ज्ञानदेवा लाधलें।**
**निवृत्तीनें दिधले माझे हातीं।।४।।**

(सतत हरिनाम मुखाने घेतल्यास शरीर गायीप्रमाणे पवित्र होते. असे हरिनाम घेतले तो कल्पांतापर्यंत वैकुंठात वास करतो. एवढेच नाही, तर त्याने घेतलेल्या नामामुळे त्याचे माता-पिता-भाऊबंद त्याच्यासकट चतुर्भुज विष्णुरुपाला प्राप्त होतात. निवृत्तीनाथांच्या असीम कृपेने हे गूढगम्य ज्ञान आपणास प्राप्त झाले असे माऊली सांगतात. )

नित्य नामात असणारा माणूस दुर्लभ, दुर्मीळ, विरळाच. मंत्रजपी असणारास भुक्ती-मुक्ती दोन्हींचा लाभ ही माउलींची स्पष्टोक्ती. गगनापेक्षाही हरिनाम महान, असे आपणास खुद्द सद्‌गुरू निवृत्तीनाथांनी कथन केल्याची साधार ग्वाही देतात माउली.

**नित्यनेम नामीं ते प्राणी दुर्लभ।**
**लक्ष्मीवल्लभ तयां जवळी।।१।।**
**नारायण हरि नारायण हरि।**
**भुक्ति मुक्ति चारी घरीं त्यांच्या।।२।।**
**हरिविण जन्म तो नरकचि पैं जाणा।**
**यमाचा पाहुणा प्राणि होय।।३।।**
**ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड।**
**गगनाहुनि वाड नाम आहे ।।४।।**

(ज्याच्याजवळ नित्यनेम नाम आहे, तो दुर्लभ आहे. त्याच्याकडे लक्ष्मी व तिचा नाथ दोघेही राहतात. नारायण हरि हा मंत्र जपणाऱ्याच्या घरी भुक्ती-मुक्ती दोन्ही हात जोडून असतात. हरिनामावीण असणाऱ्याचे जीवन नरकच असते. असा प्राणी सहजी यमाचा पाहुणा होतो. आपण श्रीगुरू निवृत्तीनाथांना विचारले तेंव्हा त्यांनी सांगितले की, गगनापेक्षा हरिनाम मोठे आहे, असे माऊली स्पष्ट करतात.)

असा हा गुरुमहिमा ज्ञानोबाराय विवरण करतात. माउलींची गुरुभक्ती थोर. गुरुसंदर्भातील विनयशीलता अपार. गुरूचरणांची जाण अपार.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

आईवडिलांच्या अकस्मात जाण्यानंतर अतिशय खडतर काळात खरेतर श्री गुरुदेव निवृत्तीनाथांनी आपल्या धाकल्या भावंडांना मानसिक आधार दिला होता. योग्य मार्गावरील शिकवण दिली होती. अक्षरशः माता-पित्याप्रमाणे बहीण भावांचा सांभाळ केला होता. अशा पारिवारिक जबाबदारीसह निवृत्तीनाथांनी थोर आध्यात्मिक जबाबदारीही तितक्याच समर्थपणे पेलली होती. साधारण तीनशे ते चारशे अभंग त्यांच्या नावावर उपलब्ध आहेत. याशिवाय स्वतंत्र हरिपाठ रचना त्यांनी केल्या. योग-अद्वैत आणि कृष्णभक्तीपर रचनांचा हा समावेश आहे.

'निवृत्तीदेवी', 'निवृत्तीसार' आणि 'उत्तर गीता टीका' असे तीन ग्रंथ ही निवृत्तीनाथांचे असल्याचे सांगितले जाते, तथापि ते अनुपलब्ध आहेत. गुरुदेव संत निवृत्तीनाथांची ही अशी थोर कीर्ती आणि अनमोल आध्यात्मिक कार्य. माउली ज्ञानोबारायांच्या एकूणच जडणघडणीत संत निवृत्तीनाथांचे स्थानमहात्म्य तितकेच तोलामोलाचे.

**-डॉ. सुनील शिंदे,**
'दत्त सुकृत', 'व्हेलेन्सिया रेसेडेन्सी',
बी विंग, फ्लॅट नं. १०४, पहिला मजला,
अगस्ती सहकारी साखर कारखाना रोड,
अकोले, जि. अहमदनगर
(मो. ९४२३०४५३४२/ ९०७५९९४३३२)

***



## गुरुभक्तीतून आत्मोद्धार

सत्कर्माचरण, आहार-विहार यांचे नियमन करून मनुष्याच्या मन-चित्ताची शुद्धी होते. आत्मबुद्धी उन्नत झाल्याने भक्ताला मी कोण, माझे सत्यस्वरुप कोणते याची जिज्ञासा मनात उत्पन्न होते. संत सांगतात त्यानुसार हा मानवी देह प्राप्त झाल्यावर स्वतःचे नीजस्वरुप जाणून घ्यावे. मनुष्य जन्माचे हे ध्येय आहे. किंबहुना आपल्या जीवाचे आत्मकल्याण त्यातच आहे. यासाठी श्रद्धा-भक्तीयुक्त अंतःकरणाने श्री गुरुचरणी अनन्यभावे शरण जावे. श्री गुरुंचे ध्यान, चरणांची पूजा, गुरुंकडून प्राप्त नामाचे नित्य स्मरण केल्याने भक्ताला गुरुकृपा होऊन मोक्ष प्राप्ती होते.

**- बी.के. गायकवाड**

**ध्यानमूलं गुरुमूर्ती, पूजा मूलं गुरुपदं**
**मंत्रमूलं गुरोवाक्यं, मोक्षमूलं गुरुकृपा**
**गुरुर्ब्रह्मा, गुरुर्विष्णू गुरुर्देवो महेश्वरः।**
**गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरुवेन नमः ।।**

या ब्रम्हांडाचा निर्माता, पालनपोषणकर्ता, संहार करून पुनर्निमिती करणारा ब्रह्मा, विष्णू, महेश या त्रिदेवांचा एकत्रित अवतार गुरुदेव दत्तात्रेय सर्वांचेच गुरू आहेत. ईश्वराचे आत्मतत्व व श्रीगुरुंचे गुरुतत्व एकच आहे. ते अनादी अनंत असून, सर्व विश्वाला अंतर्बाह्य व्यापून आहे.

परमात्म्याने सृष्टीतील सृजन, रक्षण व दुर्जनांच्या निर्दालनासाठी युगानुयुगे अनेक सगुण अवतार धारण केले. तसेच जगदकल्याणासाठी ऋषी, मुनी, संत, सद्‌गुरु अवतरले आहेत. श्री विष्णूस्वरुप व्यास मुनि श्री गणेशाच्या सहाय्याने चार वेद, उपनिषदे, अठरा पुराणे, महाभारत आणि भागवत व अन्य आध्यात्मिक ग्रंथांचे लिखाण केले आहे. महाभारत पर्वात श्रीकृष्णाने परमभक्त अर्जुनास युद्धप्रसंगी सांगितलेली 'श्रीमद्‌भगवतगीता' ही सर्व वेदांचे सार, ज्ञान-विज्ञानांनी परिपूर्ण, संपूर्ण जगताला दीपस्तंभासारखी मार्गदर्शक व जीवनदायिनी आहे. श्री व्यास मुनींचे अलौकिक, आध्यात्मिक ग्रंथरचनेच्या विश्वकार्यासाठी त्यांना जगतात गुरू म्हणून वंदिले आहे. आषाढ मासातील पौर्णिमा ही श्रीव्यास गुरुपौर्णिमा म्हणून सर्वत्र साजरी करण्यात येते.

आत्मा मालिक ध्यानपीठ ध्यानयोग मिशन, कोकमठाण द्वारा यावर्षीचा भव्य आत्मा मालिक गुरुपौर्णिमा महोत्सव २३ जुलै ते २९ जुलै २०२६ दरम्यान प. पू. सद्‌गुरू, सर्व संत आणि भाविकांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे. यानिमित्त प. पू. संत कनकेश्वरी देवीजी यांचा 'श्री गुरुगीता कथा' दिव्य सत्संग सोहळा, प. पू. सद्‌गुरू माऊलींचे दर्शन, संत सहवास, ध्यानधारणा व अन्य आध्यात्मिक कार्यक्रमांचा लाभ सर्व भाविकांना मिळेल.

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

गुरुपौर्णिमेस गुरुप्रति श्रद्धा-भक्तियुक्त अंतःकरणाने श्रीगुरुचरणी लीन होऊन अनन्यभावे शरण जावे. गुरुकृपा जीवाचा उद्वार करते. बालपणी आपले माता-पिता संस्कार करतात म्हणून ते आपले प्रथम गुरू, विद्यार्थीदशेत गुरुजन शिक्षणातून ज्ञान देतात, ते गुरुवर्य. पुढे नोकरी- व्यवसायात मार्गदर्शन करणारे व्यावसायिक गुरू होत. तथापि, मानवी जीवनात मनुष्याला शाश्वत सुख-समाधान व शांती देणारे आत्मिक ज्ञान देतात, ते आध्यात्मिक गुरू. आत्मज्ञान प्राप्तीसाठी जीवनात सद्‌गुरुंची भेट होणे आवश्यक आहे. जीवनात सात्त्विक गुणांची जोपासना, सत्कर्माचरण, संत सहवास व सत्संग यातून भक्ताला सद्‌गुरूभेट होते.

मनुष्य कर्तव्याने कितीही मोठा झाला तरी त्यापासून त्याला ऐहिक, सुख-समृद्धी मिळते. प्रपंच सुखासाठी मनुष्य सतत कष्ट करतो. प्राप्त सुख तात्पुरते असते. कर्मबंधनात मनुष्य सुख-दुःख अनुभवतो. सद्‌गुरू जीवनातील अज्ञानरुपी अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश देतात. प्रपंचातील आसक्ती कमी करून त्याला ईश्वरभक्तीत आवड निर्माण करतात. देहबुद्धीचे निरसन होऊन आत्मबुद्धी उन्नत होण्यासाठी सद्‌गुरू मुमुक्षू भक्ताकडून त्याच्या योग्यतेनुसार ध्यानधारणा, अनुष्ठाने करवून घेतात.

सत्कर्माचरण, आहार-विहार यांचे नियमन करून मनुष्याच्या मन-चित्ताची शुद्धी होते. आत्मबुद्धी उन्नत झाल्याने भक्ताला मी कोण, माझे सत्यस्वरुप कोणते याची जिज्ञासा मनात उत्पन्न होते. संत सांगतात त्यानुसार हा मानवी देह प्राप्त झाल्यावर स्वतःचे नीजस्वरुप जाणून घ्यावे. मनुष्य जन्माचे हे ध्येय आहे. किंबहुना आपल्या जीवाचे आत्मकल्याण त्यातच आहे.  यासाठी श्रद्धा-भक्तीयुक्त अंतःकरणाने श्री गुरुचरणी अनन्यभावे शरण जावे.  श्री गुरुंचे ध्यान, चरणांची पूजा, गुरुंकडून प्राप्त नामाचे नित्य स्मरण केल्याने भक्ताला गुरुकृपा होऊन मोक्ष प्राप्ती होते.

याकरिता जीवनात सद्‌गुरूमार्गदर्शनाची नितांत आवश्यकता आहे. प्रभू श्रीरामाने वशिष्ट ऋषी, तर श्रीकृष्णाने सांदिपनी ऋषींना गुरू केले. दत्तात्रेयांनी ज्यांच्याकडून काही चांगले गुण घेतले, अशा २४ जणांना आपले  गुरू केल्याचे म्हटले आहे. नवनाथांनी गुरुमहिमा सांगून गुरूआज्ञेचे पालन करुन जगदकल्याणाचे कार्य केले आहे.

श्री गुरूकार्य हे ईश्वरी कार्य आहे. सद्‌गुरू परब्रह्म ईश्वराचे सगुण साकार रुप आहे. त्यांच्या चरणी सर्वभावे लीन व्हावे. त्यांच्या चरणांची नित्य मनोभावे मानसपूजा करावी.

**‘चंद्र देखिता ताप जाती**

**गंगा देखिता पापे जाती**

**श्री गुरुदर्शने पाप, ताप दैन्य हरतीफ**

श्रीगुरू आपल्या शरणागत भक्ताच्या सदैव पाठीशी राहून त्यांच्या जीवनात शाश्वत सुख शांती व समाधान प्राप्त करून देतात. संकटसमयी आत्मबळ देतात व संकट निवारण करून रक्षण करतात. भक्ताला याची आत्मप्रचिती येते. गुरुचरित्र ग्रंथात एक कथा येते, ती गुरुनृसिंह सरस्वती गाणगापूर ग्रामी असता त्यांनी आपला परमभक्त सायंदेव यास श्रीगुरुभक्तीसंदर्भात सांगितले. ब्रह्मापुत्र त्वष्टा,

जे पुढे श्री गुरुकृपेने 'विश्वकर्मा' नावाने प्रसिद्ध झाले. त्यांनी गुरुकार्य पूर्ततेसाठी अत्यंत मनोभावे गुरुआज्ञेने काशितीर्थ क्षेत्र यात्रा विधीवत पूर्ण केली. प्रत्यक्ष काशी विश्वेश्वर प्रसन्न झाले. सर्व इच्छित मनोकामना पूर्ण केल्या. त्वष्टापुत्राने आपले गुरूंच्या चरणी गुरूंनी मागणी केलेल्या सर्व वस्तू अर्पण केल्या. त्वष्टापत्राने निष्ठेने केलेल्या गुरुभक्तीने त्यांचे गुरू प्रसन्न झाले. सकल विद्याकुशल, अष्टऐश्वर्याची प्राप्ती, त्रिमूर्ती प्रसन्नता, अष्टसिद्धी प्राप्ती झाली.

या समयी पार्वतीने ईश्वरास विचारले, गुरुभक्ती म्हणजे काय? त्यावर ईश्वर म्हणाले-

'गुरुभक्ती आहे ऐसी। एकभाव असे ज्यासी।

**सकलाभिष्ट तो पावे।।३८८।।**

**भव म्हणजे सागरू। उतरावा पैलपारू।**

**समर्थ असे एक गुरू। त्रैमूर्ती ज्याच्या अधीन।।३८९।।**

**याकारणे त्रैमूर्ती। गुरुची होय सिद्धांती। वेदशास्त्रे बोलती।**

**गुरुविणे पार नाही ।।३९०।।**

**- श्री गुरुचरित्र, अध्याय ४१**

श्री गुरुगीता वर्णन अध्याय ४९ : लोक उद्धारास्तव गुरुभक्तीसंदर्भात भगवान शंकर देवी पार्वतीस सांगतात, 'गुरुभक्ती ही कामधेनू आहे. श्रीगुरू चरणसेवा सर्व पापांचे निर्मूलन करणारी आहे. श्रीगुरुचरण तीर्थ सर्व तीर्थक्षेत्राचे पुण्यफल देणारे आहे. संसारभय दूर करणारे, जीवाने अज्ञान दूर करून, जन्मकर्म निवारण करणारे आहे. ज्ञान-वैराग्य, सिद्धी गुरुचरण सेवेतून भक्ताला प्राप्त होते.

- ११, १२, १३, १४ - गुरुगीतावर्णन

**अनेक जन्म संप्राप्त-सर्व कर्म विदाहिने।**

**स्वात्मज्ञान प्रभावेण, तस्मै श्री गुरुवेन नमः।।७३।।**

**ज्ञान विज्ञान सहितं, लभ्यते गुरुभक्तित।**

**गुसे परतंर नास्ति ध्येयोऽसि गुरु मार्गभिः।।८१।।**

**गुरो कृपा प्रसादेन आत्माराम निरीक्षयेत।**

**अनेन गुरुमार्गेन स्वात्मज्ञान पर्वतते।।११०।।**

- गुरुगीता वर्णन

श्री गुरुसेवेत सर्व सुखांची प्राप्ती होऊन समस्त दुःखे निवारण होतात. जीवाला सद्‌गती प्राप्त होण्यासाठी श्रीगुरुंना अनन्यभावे शरण जावे.

- १६, १८, - गुरुगीता वर्णन, अध्याय-४९

संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात -

**श्रीगुरूसारिखा असता पाठीराखा, इतरांचा लेखा कोण करी ।।१।।**

**राजयाची कांता काय भीक मागे, मनाचिये जोगे सिद्धी पावे।।२।।**

**कल्पतरु तळवटी जो कोणी बैसला, काय वाणू त्याला सांगिजो जी।।३।।**

**ज्ञानदेव म्हणे तरलो तरलो, आता उद्धरलो गुरुकृपे।।४।।**

आत्मा मालिक प.पू. सद्‌गुरु माऊलींनी आपल्या जीवनातील आरंभीच्या काळात अत्यंत कठोर तपश्चर्या केली. नित्य ध्यान समाधीतून ईश्वराचे, आत्म्याचे चिंतन केले. ईश्वर अनुज्ञेने, श्रीगुरुकृपेने त्यांना आत्मज्ञान मिळून आत्मबोध झाला. पुढे त्यांनी आपले गुरू श्री जंगली महाराज यांच्याकडून प्राप्त आत्मस्वरूप षडचक्रांकित प्रतिमा भाविकांना आत्मस्वरुपाच्या ध्यानातून आत्मचिंतन करण्यासाठी दिली. नित्य ध्यानातून आत्मचिंतनाने स्वस्वरुप आत्म्याची ओळख होते. आत्मा सर्वांठायी आहे. आत्म्यावर प्रेम करा ही शिकवण प.पू. सद्‌गुरु माऊलींनी सर्व मानव कल्याणासाठी दिली आहे. मागील चार दशकाहून अधिक काळ हे विश्वात्मक कार्य अखंडीत चालू आहे.

संत परमानंद महाराज यांनी 'अवतारलीला आत्मस्वरुपाची।। (नित्य नियम साधना) भक्त भाविकांच्या कल्याणास्तव श्रीगुरूआज्ञेने लिहिली आहे. त्यात ते सांगतात.

**'सद्‌गुरुकृपेविण आत्मा दुर्गम। म्हणोनी करावे हे निवेदन।**

**अनन्यभावे जावोनि शरण। हृदय श्रीचरण पूजावे ।।४१।।**

**शरण जो आला श्री गुरुसी। अनन्यभावे आत्म्यासी उपदेशी।**

**तया ज्ञान विवेक, गुह्य विज्ञान प्रकटे ।।४२।। (अध्याय ३)**

**गुरूआज्ञेने आत्मचिंतन करीता। ओळख स्वस्वरुपी होतसे।**

**आत्मदर्शन घडवोनी। आद्यगुरू स्वस्वरुपी पोहचवतसे ।।२१।। (अध्याय- ४)**

**।। आत्मा मालिक ।।**

**- बी.के. गायकवाड, पुणे.**

प्लॉट क्र. ५, नवमहाराष्ट्र को. ऑप.

हौसिंग सोसायटी, पुणे-सातारा रोड,

अरण्येश्वर कॉर्नर, पुणे - ४११००९.

मो.नं. ९४०३०२६१६४

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## हार-ही-हीरा

**आध्यात्मिकता का मार्ग धीरे-धीरे व्यक्ति को भीतर की सरलता की ओर ले जाता है। वह समझने लगता है कि जीवन को पकड़ने से वह हाथ से फिसलता है, और स्वीकार करने से वह खिल उठता है। मनुष्य का दुख इस बात में नहीं कि उसके पास कम है; उसका दुख इस बात में है कि वह स्वयं को पर्याप्त नहीं मानता। वह हमेशा किसी और जैसा बनना चाहता है। तुलना उसकी ऊर्जा को नष्ट कर देती है। समर्पण तुलना का अंत है।**

**- नीता एवम नरेश यादव**

**म**नुष्य का समूचा जीवन किसी न किसी उपलब्धि की तलाश में बीतता है। जन्म के साथ ही तुलना आरम्भ हो जाती है - कौन अधिक बुद्धिमान है, कौन अधिक सफल है, कौन अधिक सम्मानित है। धीरे-धीरे यह तुलना केवल संसार तक सीमित नहीं रहती; यह हमारे भीतर प्रवेश कर जाती है और हमारे व्यक्तित्व का आधार बन जाती है। हम जीतना सीखते हैं, पर ठहरना नहीं। हम आगे बढ़ना सीखते हैं, पर भीतर उतरना नहीं।

सभ्यता ने हमें प्रतिस्पर्धा दी, पर शांति नहीं। विज्ञान ने सुविधा दी, पर मौन नहीं। ज्ञान ने तर्क दिए, पर आत्मिक विश्राम नहीं। यही कारण है कि आधुनिक मनुष्य बाहर से सम्पन्न दिखाई देता है, किन्तु भीतर से थका हुआ, अकेला और भयभीत रहता है। वह निरन्तर किसी अदृश्य युद्ध में लगा है - स्वयं से, समाज से, समय से और मृत्यु से।

आध्यात्मिकता का द्वार वहीं खुलता है जहाँ यह युद्ध समाप्त होने लगता है। जब मनुष्य यह समझ लेता है कि हर जीत के पीछे एक नया भय छिपा है और हर उपलब्धि के पीछे एक नया खालीपन प्रतीक्षा कर रहा है, तब उसके भीतर प्रश्न जन्म लेता है - क्या जीवन केवल जीतने के लिए है? क्या अस्तित्व का उद्देश्य केवल दूसरों से आगे निकल जाना है?

यहीं से समर्पण की यात्रा प्रारम्भ होती है। समर्पण पराजय नहीं, बल्कि अहंकार की कठोरता से मुक्ति है। यह भीतर की उस गांठ का खुलना है जो हमें अस्तित्व से अलग करती है। जब व्यक्ति स्वयं को ढीला छोड़ देता है, तब वह पहली बार जीवन के संगीत को सुन पाता है। यह अध्याय उसी यात्रा का आमंत्रण है - जीत से शांति की ओर, अहंकार से प्रेम की ओर, और संघर्ष से मौन की ओर।

मनुष्य की सबसे बड़ी विडंबना यह है कि वह स्वयं को जीतने की बजाय संसार को जीतने में लगा रहता है। बचपन से उसे यही बताया जाता है कि जीवन एक प्रतियोगिता है। यदि तुम आगे नहीं बढ़े तो पीछे रह जाओगे। यदि तुमने स्वयं को सिद्ध नहीं किया तो तुम्हारा कोई मूल्य नहीं रहेगा। इस शिक्षा का परिणाम यह होता है कि व्यक्ति अपने भीतर एक निरंतर संघर्ष को जन्म दे देता है।

धीरे-धीरे यह संघर्ष उसका स्वभाव बन जाता है। वह हर संबंध को उपलब्धि की दृष्टि से देखने लगता है। प्रेम भी एक स्वामित्व बन जाता है, मित्रता भी तुलना बन जाती है, और धर्म भी अहंकार का विस्तार

बन जाता है। लोग मंदिरों में भी प्रतिस्पर्धा लेकर पहुँचते हैं। कोई अधिक धार्मिक दिखना चाहता है, कोई अधिक ज्ञानी, कोई अधिक तपस्वी।

किन्तु आध्यात्मिकता वहाँ जन्म नहीं लेती जहाँ मैं बहुत बड़ा हो। आध्यात्मिकता तो वहाँ प्रकट होती है जहाँ मैं धीरे-धीरे पिघलने लगता है। जैसे बर्फ सूर्य के सामने टिक नहीं सकती, वैसे ही अहंकार सत्य के सामने टिक नहीं सकता।

गुरु की उपस्थिति इसी कारण इतनी महत्त्वपूर्ण मानी गई है। गुरु केवल ज्ञान देने वाला व्यक्ति नहीं होता; गुरु वह दर्पण होता है जिसमें शिष्य स्वयं को देख पाता है। गुरु हमें हमारे भीतर छिपे भय, क्रोध, लालसा और अहंकार से परिचित कराता है। वह हमें बताता है कि समस्या संसार नहीं, बल्कि हमारा उससे चिपकाव है।

जब तक व्यक्ति अपने विचारों, मान्यताओं और उपलब्धियों से चिपका रहता है, तब तक वह स्वतंत्र नहीं हो सकता। स्वतंत्रता किसी बाहरी क्रांति से नहीं आती; वह भीतर की पकड़ ढीली होने से आती है।

समर्पण का अर्थ है - अस्तित्व पर विश्वास। यह स्वीकार करना कि जीवन केवल हमारी योजनाओं से नहीं चलता। बहुत कुछ ऐसा है जो हमारी समझ से परे है। नदी समुद्र तक पहुँचने के लिए संघर्ष नहीं करती; वह केवल बहती है। वृक्ष फूल खिलाने के लिए चिंता नहीं करता; वह केवल अपनी जड़ों में स्थिर रहता है। प्रकृति का प्रत्येक तत्व सहज है, केवल मनुष्य ही कृत्रिम हो गया है।

मनुष्य ने स्वयं को इतना गंभीर बना लिया है कि वह जीवन की सरलता को भूल गया है। वह हर क्षण भविष्य में जीता है। उसे लगता है कि किसी दिन वह पूर्ण हो जाएगा। किन्तु वह दिन कभी नहीं आता। क्योंकि पूर्णता कोई उपलब्धि नहीं, बल्कि स्वीकार का अनुभव है।

ध्यान का वास्तविक अर्थ भी यही है। ध्यान कोई तकनीक मात्र नहीं; ध्यान स्वयं से संघर्ष का अंत है। जब व्यक्ति कुछ क्षणों के लिए स्वयं को बदलने की कोशिश छोड़ देता है, तब भीतर मौन उतरने लगता है। वही मौन धीरे-धीरे शांति बन जाता है।

अनेक संतों ने कहा है कि परमात्मा को पाने का मार्ग हार से होकर जाता है। यह हार बाहरी नहीं, आंतरिक है। यह अपने अहंकार की हार है। यह स्वीकार करना कि हम सब कुछ नियंत्रित नहीं कर सकते।

जब व्यक्ति टूटता है, तभी वह खुलता है। बीज यदि टूटे नहीं तो वृक्ष नहीं बन सकता। बादल यदि बरसे नहीं तो धरती हरी नहीं हो सकती। इसी प्रकार मनुष्य यदि अपने कठोर अहंकार से मुक्त न हो तो उसके भीतर प्रेम नहीं खिल सकता।

आज का समाज सफलता को बहुत महत्त्व देता है, किन्तु सफलता की परिभाषा अधूरी है। यदि किसी व्यक्ति ने संसार जीत लिया पर स्वयं को खो दिया, तो वह वास्तव में सफल नहीं कहा जा सकता। यही कारण है कि बड़े-बड़े पदों पर बैठे लोग भी भीतर से असंतुष्ट रहते हैं। उनके पास सब कुछ होता है, पर शांति नहीं होती।

शांति किसी उपलब्धि का परिणाम नहीं है। शांति उस क्षण जन्म लेती है जब मनुष्य स्वयं को स्वीकार कर लेता है। जब वह अपने भीतर की असुरक्षाओं से भागना बंद कर देता है। जब वह यह समझ लेता है कि जीवन कोई युद्धभूमि नहीं, बल्कि एक रहस्य है।

गुरु-शिष्य परंपरा का सार भी यही है। शिष्य का अर्थ केवल विद्यार्थी नहीं होता। शिष्य वह है जो सीखने के लिए स्वयं को खाली करने को तैयार हो। यदि पात्र पहले से भरा हुआ हो तो उसमें नया जल कैसे डाला जा सकता है?

इसीलिए संतों ने विनम्रता को सबसे बड़ा गुण माना। विनम्रता कमजोरी नहीं है। विनम्रता वह शक्ति है जो व्यक्ति को सत्य के सामने झुकने योग्य बनाती है। जो झुक नहीं सकता, वह सीख नहीं सकता। जो सीख नहीं सकता, वह बदल नहीं सकता।

आध्यात्मिकता का मार्ग धीरे-धीरे व्यक्ति को भीतर की सरलता की ओर ले जाता है। वह समझने लगता है कि जीवन को पकड़ने से वह हाथ से फिसलता है, और स्वीकार करने से वह खिल उठता है। मनुष्य का दुख इस बात में नहीं कि उसके पास कम है; उसका दुख इस बात में है कि वह स्वयं को पर्याप्त नहीं मानता। वह हमेशा किसी और जैसा बनना चाहता है। तुलना उसकी ऊर्जा को नष्ट कर देती है। समर्पण तुलना का अंत है।

जब हम स्वयं को अस्तित्व के हवाले कर देते हैं, तब भीतर एक नई सहजता जन्म लेती है। हम वर्तमान में जीना सीखते हैं। हम छोटी-छोटी बातों में आनंद अनुभव करने लगते हैं - हवा के स्पर्श में, पक्षियों की आवाज़ में, मौन की गहराई में।

सच्चा धर्म किसी विचारधारा का नाम नहीं है। सच्चा धर्म जागरूकता है। वह जीवन को उसी रूप में स्वीकार करने की कला है जैसा वह है। जब अहंकार गिरता है, तब प्रेम प्रकट होता है। और प्रेम ही वह सेतु है जो मनुष्य को परमात्मा से जोड़ता है। प्रेम में कोई जीतता नहीं, दोनों मिटते हैं। इसी मिटने में मिलन है।

अंततः मनुष्य को यह समझना ही पड़ता है कि वह जितना स्वयं को बचाने की कोशिश करता है, उतना ही दुखी होता जाता है। और जितना स्वयं को छोड़ता जाता है, उतना ही मुक्त होता जाता है। यही समर्पण का रहस्य है। यही हार का हीरा है।

गुरु कृपा में कुछ काव्य अवतरित है जो कहता है -

हार-ही-हीरा

जो जीतता है, वह अंततः हार जाता है;<br>
और जो हारने को तैयार हो जाता है, उसके लिए ही गुरु उपलब्ध होते है।<br>
हमारा पूरा जीवन एक दौड़ है।<br>
बचपन से सिखाया जाता है -<br>
आगे बढ़ो, सबसे बेहतर बनो, किसी से पीछे मत रहो।<br>
धीरे-धीरे यह प्रतिस्पर्धा केवल बाहर नहीं रहती, भीतर भी घर बना लेती है।<br>
फिर हम हर जगह जीतना चाहते है,<br>
बहस में, प्रेम में, धर्म में, संबंधों में, ज्ञान में।<br>
यहाँ तक कि इंसान ध्यान को भी जीतने की वस्तु बना लेता है,<br>
क्योंकि, अहंकार को सबसे अधिक आनंद जीत में मिलता है,<br>
और हर जीत हमारे अस्तित्व को मजबूत करती है।<br>
हर विजय हमारे  चारों ओर एक और दीवार खड़ी कर देती है,

पर विडंबना यह है कि हम जितना जीतता जाते है,
उतना ही अकेले होते जाते है।
बाहर से हम सफल दिखाई देते है, पर
भीतर से भय, तनाव और खालीपन से भरे होते है।
क्योंकि, जीत हमेशा किसी के विरुद्ध होती है।
जहाँ जीत है, वहाँ संघर्ष है।
जहाँ संघर्ष है, वहाँ शांति नहीं हो सकती।

अब तो हारें.. यहाँ
यह संसार से हारने की बात नहीं है।
यह अपने मैं से हारने की बात है।
यह एक समर्पण की बात है,
यह वह क्षण है, जब हम थक जाते है, अपने अहंकार का बोझ उठाते-उठाते।
और फिरहम कहते है -
अब बहुत हुआ, अब मैं नहीं जीतना चाहता।
अब मैं बहना चाहता हूँ।
समर्पण हार नहीं, सबसे बड़ी क्रांति है।
क्योंकि समर्पण में हम अपने छोटे से अहंकार को छोड़ देते है और विराट अस्तित्व से जुड़ जाते है।
तब हमारे पास मैं नहीं।
हमने स्वयं को खाली कर दिया,
बाँसुरी की तरह खोखले हो गए ,
ताकि गुरु मंत्र उसके भीतर से गीत बनकर बह सके।
जीत का मूल चार कौड़ियाँ,
दुनिया की सारी जीतें बहुत छोटी हैं।
आज लोग हमारी प्रशंसा करेंगे, कल भूल जाएँगे।
आजहम  शिखर पर हो, कल कोई और होगा।
यह सब समय का खेल है।
सिकंदर ने दुनिया जीत ली,
लेकिन स्वयं को नहीं जीत पाया।
और बुद्ध ने स्वयं को मिटा दिया,ज्ञ
इसलिए पूरा अस्तित्व उनका हो गया
दुनिया की जीतें चार कौड़ियों जैसी हैं -
क्षणिक, सस्ती, मिट जाने वाली।
वे केवल अहंकार को तृप्त करती हैं, आत्मा को नहीं।

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

और हार मूल हीरा..
यहाँ हार का अर्थ है -
अहंकार का गिर जाना।
अपने नियंत्रण की जिद छोड़ देना।
जीवन को स्वीकार कर लेना जैसा वह है।
और जैसे ही यह हार घटती है,
भीतर एक अनमोल शांति जन्म लेती है।
वही हीरा है।
ध्यान क्या है?
हारने की कला।
गुरु प्रेम क्या है?
हारने की कला।
प्रार्थना क्या है?
हारने की कला।
जब तक हम खड़े है,
चल रहे है,
परमात्मा नहीं उतर सकता।
जब हम झुकते हो, तभी वास्तव में गुरु द्वार खुलता है।
हमने बहुत जीत लिया।
अब थोड़ा हार कर देखे ।
क्योंकि,
सद्‌गुरु के ह्रदय मंदिर में प्रवेश विजेताओं को नहीं,
समर्पितों को मिलता है।
जो मिट जाता है, वही गुरु का हो जाता है।

अंततः आध्यात्मिक यात्रा किसी उपलब्धि पर समाप्त नहीं होती, बल्कि एक गहन समर्पण में विलीन हो जाती है। मनुष्य जब अपने अहंकार की कठोरता को छोड़ देता है, तभी वह उस मौन को सुन पाता है जिसमें गुरु का स्पर्श छिपा है। इसी भावभूमि पर यह कविता अध्याय का सार बनकर प्रकट होती।

**।।आत्मा मालिक।।**

**-नीता एवम नरेश यादव,**
आत्मा मालिक परिवार, इंदौर

***

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

|| आत्मा मालिक ||



सस्नेह निमंत्रण

**आत्मा मालिक ध्यानपीठ, कोकमठाण,**
**आत्मा मालिक ध्यान योग मिशन**
आयोजित

# ||गुरुपौर्णिमा महोत्सव||

**दि. २३ जुलाई से २९ जुलाई २०२६**

## दिव्य दर्शन एवं सत्संग समारोह

**||अखंड अन्नदान||**

## श्री गुरुगीता कथा

**दि. २३ जुलाई से २७ जुलाई २०२६**

सभी भक्तों को सूचित किया जाता है कि प्रतिवर्ष की भांति इस वर्ष भी परम पूज्य सद्गुरु आत्मा मालिक माउली के पावन सानिध्य में कोकमठाण आश्रम में 'आत्मा मालिक गुरुपूर्णिमा महोत्सव' का आयोजन किया जा रहा है। इस समारोह में आध्यात्मिक परिवार के सभी संत, महंत, साधक और विभिन्न क्षेत्रों के गणमान्य व्यक्ति उपस्थित रहेंगे। अतः आप सभी से विनम्र अनुरोध है कि इस सत्संग समारोह में सम्मिलित होकर सद्गुरु कृपा और संत दर्शन का लाभ उठाएँ।



श्री श्री १००८ महामंडलेश्वर
प.पु. माँ कनकेश्वरी देवी जी

**कार्यक्रम स्थल**

**आत्मा मालिक ध्यान योग मिशन**
**आत्मा मालिक ध्यानपीठ, कोकमठाण,**
शिरडी कोपरगाँव रोड, मु. पो. कोकमठाण,
ता. कोपरगाँव, जि. अहिल्यानगर

मो. 9561480448, 8380039305, 8380039405

✻ प्रेषक ✻

**संपादक, मासिक ॐ गुरुदेव**

**विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण,**
मु.पो.कोकमठाण (चैतन्यपुरी), शिर्डी-कोपरगांव रोड,
ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)-४२३६०१